
१०३ शतकोत्तर वाटचाल



एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

• पुणे, शनिवार ९ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-३२३, पाने-८, किंमत : ₹ ७ NAVAKAL

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 4, Issue - 323, Marathi - Daily - Pune, 9 August, 2025 Page- 8 Price- Rs. 7/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com







## तामिळनाडूचे स्वतंत्र शैक्षणिक धोरण हिंदीऐवजी विज्ञान! कृत्रिम बुद्धिमत्ता

**केंद्र सरकारच्या हिंदी सक्तीच्या विरोधात भूमिका घेणाऱ्या तामिळनाडू सरकारने केंद्र सरकारचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण नाकारत राज्याचे स्वतंत्र शैक्षणिक धोरण जाहीर केले आहे. यात त्रिभाषा सूत्राऐवजी द्विभाषा सूत्र स्वीकारण्यात आले असून, त्यात तमिळ आणि इंग्रजीचा समावेश आहे. नवे धोरण ठरवण्यासाठी मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी माजी न्यायमूर्ती मुरुगेसन यांच्या नेतृत्वाखाली नेमलेल्या समितीने हे धोरण तयार केले आहे.**

■ चेन्नई

**तामिळनाडू** राज्याच्या शैक्षणिक धोरणानुसार विज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्या शिक्षणाला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. तिसरी, पाचवी व आठवीच्या सार्वत्रिक परीक्षाही रद्द करण्यात आल्या आहेत. पदवी प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा रद्द करण्यात आल्या असून, त्याऐवजी ११ वी व १२ वीचे गुणच गृहित धरले जाणार आहेत.

केंद्र सरकारच्या शैक्षणिक धोरणानुसार देशात त्रिभाषा सूत्र राबवण्याचे निश्चित करण्यात आले आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी या हिंदी सक्तीला सुरुवातीपासून विरोध केला आहे. केंद्रीय शैक्षणिक धोरण लागू न केल्याबद्दल केंद्र



सरकारने तामिळनाडूचा समग्र शिक्षा धोरणाचा २,१५२ कोटी रुपयांचा निधी रोखला होता. केंद्रीय शैक्षणिक धोरण लागू केल्यानंतरच हा निधी देण्यात येईल, असे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी स्टॅलिन यांना ठणकावले होते. स्टॅलिन यांनीही राज्याच्या हितापुढे याची फिकीर नसून त्यांनी मला १ हजार कोटी रुपये जरी दिले तरी मी हे धोरण राबवणार नाही, असे प्रत्युत्तर स्टॅलिन यांनी दिले होते. आता त्यांनी थेट राज्याचे स्वतंत्र शैक्षणिक धोरण जाहीर करून केंद्र सरकारला पुन्हा आव्हान दिले आहे.

# राहुल गांधींच्या बैठकीत उद्धव ठाकरे शेवटच्या रांगेत! सत्ताधाऱ्यांचे टीकास्त्र

■ मुंबई

**लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या दिल्लीतील सुनहरी बाग मार्गावरील शासकीय निवासस्थानी काल इंडिया आघाडीतील पक्षनेत्यांसाठी स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. तिथे शिवसेना उबाठा पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे शेवटच्या रांगेत बसल्याचे फोटो समाजमाध्यमावर व्हायरल झाले आहेत. त्यावरून महायुती सत्ताधारी पक्षातील भाजपा व शिवसेना शिंदे गटाने महाराष्ट्राचा अपमान झाला, अशी टीकेची झोड उद्धव ठाकरेंवर उठवली आहे.**

**शिवसेना** शिंदे गटाच्या आमदार मनीषा कायंदे यांच्यासह कार्यकर्त्यांनी मुंबईतील बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिस्थळावर जाऊन उपरोधिक आंदोलन केले. यावेळी शिंदेसैनिकांनी, साहेब यांना (उद्धव ठाकरे ) माफ करा, अशी घोषणाबाजी करत पोस्टर झळकावले. यावेळी आ. मनीषा कायंदे म्हणाल्या की, जेव्हापासून महाविकास आघाडी स्थापन झाली, तेव्हापासून उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे मुख्यालय दिल्ली झाले आहे. त्यांचे आका राहुल गांधी आणि सोनिया गांधी असल्याचे आता सगळ्यांना स्पष्ट समजले आहे. जे उद्धव ठाकरे भाजपा-शिवसेना युतीत सन्मानाने बसायचे, ज्यांच्या शब्दाला वजन होते, त्यांना आता दिल्लीतील इंडिया बैठकीत पाचव्या-सहाव्या रांगेत बसवले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, ज्यांचा अपमान झाला त्यांना काही वाटत नसेल तर काय प्रतिक्रिया द्यायची. जे स्वाभिमान विकतात त्यांना काँग्रेसने त्यांची जागा दाखवली.

शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांनी एक्सवर लिहिले की, उद्धव ठाकरे काय ही तुमची किंमत?



शिवरायांचा वारसा सांगता आणि काँग्रेसच्या बैठकीत शेवटच्या रांगेत बसलात? हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी आम्हाला आत्मसन्मान, स्वाभिमान शिकवला. अपमानाविरुद्ध पेटून उठायचा शिवरायांनी आणि बाळासाहेबांनी धडा दिला. तुम्ही यातील काहीच घेतले नाही का? आदित्य ठाकरे काँग्रेसने तुमची काय अवस्था केली? एकेक खासदार असलेल्या पक्षांना सन्मान देऊन पुढच्या रांगेत बसवले. तुम्ही दिल्लीत जाऊन महाराष्ट्राची लाज घालवली. थोडा जरी स्वाभिमान आत्मसन्मान शिल्लक असेल तर जरा तरी पेटून उ(बा)ठा.

तर राज्याचे सांस्कृतिक मंत्री व भाजपा नेते आशिष शेलार म्हणाले की, उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांना कुठे बसवले? त्यांना बरोबर का घेतले नाही? ते बाजूला का नव्हते या सगळ्या गोष्टींचा विचार करण्याचे शहाणपण उद्धवजी यांना आणि त्यांच्या पक्षाला सुचेल, अशीच अपेक्षा आहे. मात्र एक गोष्ट मी ठामपणे म्हणेन की, उद्धव ठाकरे यांना सहाव्या रांगेत बसवणे हा काँग्रेसने एका अर्थाने » पान ७ वर

### मोदीही मागच्या रांगेत तेव्हा भाजपाचे मौन

इंडिया आघाडीच्या बैठकीत उद्धव ठाकरे यांना शेवटच्या रांगेत बसवल्याने शिंदे यांची शिवसेना आणि भाजपा त्यांच्यावर महाराष्ट्राचा अपमान झाल्याची टीका करत आहेत. मार्च महिन्यात कॅनडा येथे झालेल्या जी-सेव्हन शिखर परिषदेत मोदी विशेष आमंत्रित होते. तिथे फोटोसेशनच्या वेळी त्यांना मागच्या रांगेत उभे करण्यात आले होते. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदोमीर झेलेन्स्की, मेक्सिकोच्या राष्ट्राध्यक्ष क्लॉडिया शीनबॉम आणि इटालीच्या राष्ट्राध्यक्ष जॉर्जिया मेलोनी यांना पुढच्या रांगेत स्थान मिळाले होते. त्यावेळी देशाचा अपमान झाला, अशी टीका कुणीच केली नव्हती.

## शपथपत्रावर सहीनिशी आरोप करा आयोगाचे राहुल गांधींना आव्हान

■ नवी दिल्ली

**काँग्रेस** नेते खासदार राहुल गांधी यांनी काल पत्रकार परिषदेत निवडणूक आयोगावर मतांची राजरोस चोरी केल्याचा गंभीर आरोप लावल्यानंतर आज निवडणूक आयोगाने राहुल गांधींना एक शपथपत्र पाठवले. जे काही आरोप करायचे आहेत ते या शपथपत्रावर स्वतःच्या स्वाक्षरीनिशी करा अन्यथा मतदारांची दिशाभूल केल्याबद्दल देशाची जाहीर माफी मागा, असे आव्हान आयोगाने राहुल गांधी यांना



दिले. तर दुसरीकडे राहुल गांधी यांनी आयोगाला जाहीरपणे पाच प्रश्न विचारून त्या प्रश्नांची उत्तरे देण्याची मागणी करत पलटवार केला.

राहुल गांधी यांच्या कालच्या पत्रकार परिषदेनंतर निवडणूक आयोगाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एक पोस्ट केली. » पान ७ वर

## आसाराम बापूच्या जामिनाला मुदतवाढ



■ अहमदाबाद

**स्वयंघोषित** आध्यात्मिक गुरू आसाराम बापूला बलात्कार प्रकरणात वैद्यकीय कारणास्तव देण्यात आलेल्या जामिनाची मुदत गुजरात उच्च न्यायालयाने २१ ऑगस्टपर्यंत वाढवली.

न्या. जे. व्होरा आणि न्या. पी. एम. रावल यांच्या खंडपीठासमोर आसाराम बापूच्या याचिकेवर सुनावणी झाली. त्याप्रसंगी आसाराम बापूची प्रकृती चिंताजनक असून, त्याला अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले आहे, असे त्याच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले. त्यांनी त्यांच्या जामिनाच्या मुदतीत वाढ करण्याची विनंती केली. महत्त्वाची बाब म्हणजे मागील सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने आसारामला यापुढे जामिनाची मुदत वाढवून देणार नाही, असे बजावले होते. मात्र आसाराम बापूने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने नंतर त्याने गुजरात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्यामुळे उच्च न्यायालयाने त्याच्या जामिनाला मुदतवाढ दिली.

## एकनाथ शिंदे - आदित्य ठाकरे वरळी कोळीवाड्यात आमनेसामने

■ मुंबई

**नारळी** पौर्णिमेनिमित्त आज वरळी कोळीवाड्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि वरळीचे उबाठा आमदार आदित्य ठाकरे आमने -सामने आले. यामुळे परिसरात दोन्ही नेत्यांच्या समर्थकांमध्ये रेटारेटी झाली. पोलिसांनी दोन्ही सेनेच्या कार्यकर्त्यांना बाजूला केले. मात्र पोलिसांनी योग्य नियोजन न केल्यानेच दोन्ही नेते एकाच वेळी या ठिकाणी येऊन हा काही काळ गोंधळ उडाला.


संध्याकाळी वाजातच्या सुमारास एकनाथ शिंदे आपल्या कार्यकर्त्यांसह वरळी कोळीवाड्यात पोहोचले. नारळी पौर्णिमेनिमित्त एकनाथ शिंदे हे पहिल्यांदाच वरळी कोळीवाड्यात आले होते. ते कोळीवाड्यातून परतत असतानाच आदित्य ठाकरेंचे तिथे आगमन झाले. अरुंद रस्त्यामुळे दोन्ही नेते आणि त्यांचे कार्यकर्ते यांची गर्दी झाली. दोन्ही बाजूंनी शेरेबाजी झाली. मात्र, पोलिसांनी शिंदे वाट करून दिली. यावेळी उबाठाचे आमदार सचिन अहिर यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यानंतर तिथून ते निघून गेले. कोळीवाड्यातून बाहेर पडताना एकनाथ शिंदे म्हणाले की, आज नारळी पौर्णिमेचा उत्साह आहे, सगळीकडे आनंदाचे वातावरण आहे. सर्वांनी यात सहभाग घेतला पाहिजे. सर्व कोळी बांधव, लाडक्या बहिणी एकत्र येऊन आज हा सण मोठ्या उत्साहात साजरा करत आहेत. या कोळीवाड्याचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. आदित्य ठाकरे वरळी कोळीवाड्यातील » पान ७ वर

## मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरण दाद मागण्याचा निर्णय नाही

■ मुंबई

**मालेगाव** बॉम्बस्फोट प्रकरणी सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याच्या विशेष न्यायालयाच्या निकालाविरोधात उच्च न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय अद्याप झाला नाही असे विधी व न्याय विभागाने माहिती अधिकारात विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात म्हटले आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ते अजय बोस यांनी याविषयी प्रश्न विचारला होता. राज्य सरकारने अद्याप कोणताही निर्णय झाला



नसल्याचे त्यांना कळवले आहे. ३१ जुलै रोजी विशेष तपास पथकाच्या न्यायालयाने २००८ साली मालेगाव इथे झालेल्या स्फोटाच्या प्रकरणातून सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली होती. त्यानंतर या आरोपींची गावागावात मिरवणूकही काढण्यात आली होती. या निकालानंतर मुख्यमंत्र्यांनीही भगवा दहशतवाद » पान ७ वर

## शरीरसंबंधांचे वय अठराच असावे सरकारची सुप्रीम कोर्टात भूमिका

■ मुंबई

**शारीरिक** संबंधासाठी कायदेशीर संमतीचे वय १६ वर्षे केल्यास अल्पवयीन मुली घरातील किंवा समाजातील भक्षकांचे बळी ठरू शकतात, असे केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात सांगितले. शरीरसंबंधांच्या संमतीचे वय कमी करावे, यासंदर्भातील याचिकेच्या सुनावणीवेळी सरकारने ही भूमिका मांडली. केंद्र सरकारने आपल्या अहवालात नमूद केले की, किशोरवयीन प्रेमसंबंधांचा आधार घेऊन संमतीचे वय कमी करणे कायदेशीरदृष्ट्या अयोग्यच नाही तर अत्यंत धोकादायक ठरू शकते. या निर्णयामुळे लैंगिक शोषण करणाऱ्यांना कायद्याच्या फटीतून बचाव करण्याचा मार्ग उपलब्ध होईल. त्यामुळे अल्पवयीन मुला-मुलींचे अधिक शोषण होण्याचा धोका वाढेल. काही प्रकरणांमध्ये भावनिक ओढ किंवा कुतूहलामुळे किशोरवयीन मुले प्रेमसंबंध किंवा शारीरिक संबंध ठेवतात. या प्रकरणांमध्ये न्यायालयाने प्रकरणनिहाय तपास करून न्यायिक विवेक वापरावा आणि सौम्य दृष्टीकोन बाळगावा. परंतु यासाठी कायद्यात बदल करून संमतीचे वय कमी करणे योग्य ठरणार नाही. सरकारचा यासंदर्भात संसदेत कोणताही कायदा आणण्याचा विचार » पान ७ वर

## एअर इंडिया सुरक्षेसंदर्भातील जनहित याचिका फेटाळली

■ नवी दिल्ली

**विमानांचे** किंवा हवाई कंपनीचे सुरक्षा परीक्षण करण्याची मागणी करताना तुम्ही केवळ एअर इंडियाचाच का विचार करता? इतर कंपन्यांचे काय, असा प्रश्न उपस्थित करत आज सर्वोच्च न्यायालयाने या विमानाच्या सुरक्षा तपासणीसाठी दाखल केलेली जनहित याचिका फेटाळली. नरेंद्र कुमार गोस्वामी यांनी सर्वोच्च न्यायालयात ही जनहित याचिका दाखल केली होती. एखाद्या आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ संस्थेकडून एअर इंडियाच्या सर्व विमानांचे सुरक्षा ऑडिट करण्यात यावे. हे काम करून घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमावी, अशी मागणी करण्यात आली.

## मुख्यमंत्रीच भाजपा संपवायला निघालेत! मनोज जरांगेंचा टोला

■ सातारा



**मराठा** आरक्षणाचा मुद्दा बाजूला ठेवून ओबीसी बांधवांना गोव्यात बोलावून, तिथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मराठ्यांच्या विरोधात कान भरत आहेत. भाजपासाठी ही वागणूक पूर्णपणे घातक आहे. देवेंद्र फडणवीस हे भाजपा संपवायला निघाले आहेत, असा टोला आज मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी केला आहे.

मनोज जरांगे-पाटील म्हणाले की, मराठा समाज ओबीसी समाजामधूनच आरक्षण घेणार आणि २९ तारखेला आरक्षणाचा तुकडा पाडणार. राज्यात मराठा आणि ओबीसी समाजामध्ये दंगल घडली तर त्याला जबाबदार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असतील. ते म्हणतात की, ओबीसीच्या हक्कासाठी लढणार. याचा अर्थ मराठ्यांच्या गोरगरीब जनतेसाठी तुम्हाला लढायचे नाही का? मराठ्यांनो आता जागे व्हा. मराठ्यांच्या मंत्र्यांना घोटाळ्यात क्लीनचिट मिळत नाही. त्यामुळे त्यांचेच नाव खराब होणार आहे. सर्वच पक्षातील मराठा नेते ते संपवायला निघाले आहेत. मराठा आणि ओबीसी दंगल घडवण्याचा खटाटोप सुरू आहे. पण दोन्ही समाज एकत्र येऊन फडणवीस यांना अद्दल घडवतील.

## ३.६ अब्ज डॉलरचा करार स्थगित ट्रम्पच्या कराला भारताचे प्रत्युत्तर

■ नवी दिल्ली

**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के आयात शुल्क (टॅरिफ) लादल्यानंतर सावध भूमिका घेणाऱ्या भारताने आता ट्रम्प यांना प्रत्युत्तर देण्याची तयारी चालवली असून, अमेरिकेकडून बोईंग जेट विमान खरेदीच्या ३.६ अब्ज डॉलरच्या कराराला स्थगिती दिली आहे, अशी माहिती खात्रीलायक सुत्रांनी दिली आहे.

भारत - अमेरिकेदरम्यान २०२१ मध्ये ६ बोईंग पी-८ आय या सागरी गस्त विमानासाठीचा २.४२ अब्ज डॉलरच्या मूळ कराराला मंजुरी देण्यात आली होती. मात्र त्यानंतर महागाई आणि पुरवठा साखळीमध्ये आलेले



व्यत्यय यामुळे काही वर्षांत कराराच्या मूळ रकमेत वाढ झाली होती. त्यात आता ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के आयात शुल्क लागू केल्याने कराराच्या रकमेत जवळपास पन्नास टक्के वाढ होणार असल्याने संरक्षण मंत्रालयाने या कराराला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे, असे सांगण्यात आले. मात्र या कराराला स्थगिती दिल्याबद्दल भारत सरकारच्या वतीने अद्याप अधिकृतपणे कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही.

## स्वयंपाकाच्या गॅस अनुदानापोटी तेल कंपन्यांना ३० हजार कोटींची सवलत

■ नवी दिल्ली

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेत आज केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत स्वयंपाक गॅस अनुदानापोटी तेल कंपन्यांना ३० हजार कोटींची सवलत मंजूर केली. याशिवाय आसाम व त्रिपुराच्या विकास योजनांसाठी ४,२५० कोटींचा निधी, तंत्र शिक्षण विकासासाठी ४२०० कोटी आणि उज्वला योजनेच्या अनुदानाच्या भरपाईसाठी १२ हजार कोटींचे अनुदान मंजूर केले.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव याची माहिती देताना म्हणाले की, घरगुती स्वयंपाक गॅस अनुदानापोटी झालेल्या नुकसानीसाठी सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांना ३०,००० कोटी रुपये सवलत मंजूर केली आहे. या सवलतीची विभागणी तेल आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाद्वारे करून बारा हप्त्यांमध्ये रक्कम दिली जाईल. आंतरराष्ट्रीय एलपीजीच्या किमती २०२४-२५ मध्ये वाढल्या. तरीही ग्राहकांना वाढीचा परिणाम होऊ नये म्हणून सरकारने ३० हजार कोटींची नुकसान भरपाई मंजूर केली. यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांना कच्चे तेल खरेदी, कर्जफेड आणि भांडवली खर्चासाठी मदत » पान ७ वर

## शेअर बाजार गडगडला पाच लाख कोटी बुडाले

■ मुंबई

**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर पन्नास टक्के आयातशुल्क लावल्यानंतर भारताबरोबर कोणतीही चर्चा होणार नाही,अशी ताठर भूमिका घेतल्याचे नकारात्मक पडसाद आज भारतीय शेअर बाजारावर उमटले. सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही प्रमुख निर्देशांकांत आज मोठी घसरण झाली.आजच्या दिवसात गुंतवणूकदारांचे तब्बल पाच लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्समध्ये आज ७६५.४७ अंकांची मोठी घसरण झाली. सेन्सेक्स या घसरणीसह ७९,८५७.७९ अंकांवर स्थिरावला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी २३२.८५ अंकांच्या घसरणीसह २४,३६३.३० अंकांवर बंद झाला.

## बिहारमधील सीता मंदिराचे अमित शहांकडून भूमिपूजन

■ पाटणा

**बिहारमध्ये** येत्या काही महिन्यात विधानसभा निवडणूक होत आहे. या पार्श्वभूमीवर आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सीतामढी येथे जानकी मंदिराचे भूमीपूजन केले. यावेळी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमारही उपस्थित होते.

पौराणिक मान्यतेनुसार सितामढी हे सीतेचे जन्मस्थान मानले जाते. या ठिकाणी सीतेचे प्राचीन मंदिर आधीपासून आहे. त्यापासून काही अंतरावरील पुनौरा धाम येथील ६७ एकर जागेवर नवीन मंदिर



उभारले जाणार आहे. आजच्या भूमिपूजन सोहळ्यासाठी पुनौरा धाममध्ये सुंदर सजावट करण्यात आली होती.

यावेळी झालेल्या अनेक धार्मिक अनुष्ठानांमध्ये अमित शहा यांनी भाग घेतला. हे मंदिर उभारले जाणार आहे. या मंदिराचे काम ११ महिन्यांत पूर्ण होईल, असेही अमित शहा यांनी म्हटले आहे.

# छोट्या जाहिराती

**संपर्क करा**
**८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

## पाहिजेत

नवीन टायर्स, युरिया, इंजिन ऑईल व बॅटरी विक्री व मार्केटिंगसाठी रिटायर्ड व्यक्ती पाहिजे. टीप :- दीर्घ मुदतीची सुट्टी मिळणार नाही (गणपती व मे महिना) भेटा - गोडाऊन-आशीर्वाद टायर सर्व्हिस, 119 - सी, रणजित स्टुडिओ, दादासाहेब फाळके रोड, दादर (पूर्व), मुंबई - 400014. मो. **9833052044/9867709545** {NCC250052}

पेस्टिंग, बुकबाईंडिंग/कार्टन पेस्टिंगच्या कामात अनुभवी पेस्टर, कारीगर व हेल्पर पाहिजेत. वेतन 20,000/- संपर्क - **8652471232** {NC251849}

दहिसर (ईस्ट) / घोडबंदररोड ठाणे येथे हाऊसकिपिंगसाठी मुले पाहिजेत. 14000/- **9820219764 / 8591074394** {NC251865}

अंधेरी पूर्व इलेक्ट्रॉनिक इन्स्ट्रुमेंट कंपनीसाठी अनुभवी डिप्लोमा इंजिनियर, ITI टेक्निशिअन आणि पीसीबी सोल्डरिंगसाठी अनुभवी महिला/ मुली पाहिजेत. प्रीमीयर इलेक्ट्रॉनिक **9988117372** {NC251856}

दादर पश्चिमला दहावी, बारावी शिकलेली अनुभवी/बिनअनुभवी ऑफिस असिस्टंट हवी - **8879166871 / 9082148924** {NC251897}

सोलना ऑफसेट मशीनसाठी बॉयलर पाहिजे. (भायखळा) **9820017588** {NC251896}

वकिलाच्या ऑफिसमध्ये कामासाठी मुले पाहिजे. 32 च्या आत मध्ये भांडुप संपर्क करावा **9892769253** {NC251895}

HDFC bank जॉबसाठी मुले-मुलींची डायरेक्ट भर्ती पगार 17500-35000, **7758908779** {NC251893}

मोठ्या प्रमाणात हाऊसकिपिंग पाहिजे. मुलुंड, कांदिवली, अंधेरी मालाड, संपर्क - **8097507698** {NC251899}

**लोअर परेल (वेस्ट) मध्ये प्रिंटिंग प्रेससाठी पेपर कटिंग मशीन ऑपरेटर (Seypa Machine) बायडिंगच्या अनुभवी पाहिजेत. आकर्षक पगार, पीएफ, ईएसआइसी सुविधा. प्रत्यक्ष भेटा - दुपारी 3 ते 7 पर्यंत. संपर्क - 9920471399, 9820064464** {NC251889}

## पाहिजेत

पेस्ट कंट्रोल ऑपरेटरसाठी अनुभवी/बिनअनुभवी कामगार पाहिजेत. गिरगाव **9820534868/ 9833832512** {NC250051}

**डीएचएलसाठी ऑफिसबॉय पाहिजेत. पगार 20000/-, 8 तास. संपर्क 7208551929, 9702126571** {NC251847}

बोरिवली पश्चिम येथे हायड्रॉलिक प्रेसच्या सर्विस आणि रिपेअरिंगसाठी हायड्रोलिक इंजिनिअर/वर्कर पाहिजेत. **9820477791** {NC251770}

बोरिवली पश्चिम येथे कारखान्यात डाय मेकर कारागीर आणि मदतनीस पाहिजेत. **9820477791** {NC251769}

सरकारमान्य कंपनीत निवृत्त अधिकारी/टीचर/ गृहिणी पाहिजेत. पगार+ पीएफ. **9670731420** {NC251828}

इमिटेशन ज्वेलरी शोरूमसाठी सेल्स गर्ल आणि पॅकिंगसाठी मुलगी पाहिजे.-झवेरी बाजार- **9820392333.** {NC251825}

अंधेरी कुरिअरला, बँक टू बँक डिलिव्हरी, पिकअप, मार्केटिंग, कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत - **8879337077** {NC251786}

मुलुंडमध्ये क्लाससाठी गाणी / इन्स्ट्रुमेंट्स / नृत्य शिकवण्यासाठी टीचर पाहिजेत. **9821575352 / 9699987575** {NC251818}

कोमोरी मशीनसाठी फिडरमन, बॉयलर आणि हेल्पर पाहिजेत. ठाणे - **9892636100/ 9819410350** {NC251823}

Tempo Driver / हेल्पर/Peon पाहिजेत. (राहण्याची सोय) सांताक्रूज संपर्क - **7506808085** {NC251873}

इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टरला ( मुंबई व लोणावळा साईटकरिता ) अनुभवी किंवा बिनअनुभव असलेले वायरमन व हेल्पर पाहिजेत आकर्षक पगार + गाडीभत्ता संपर्क - **9819178977.** {NC251871}

तोरण - दिवा - ज्वेलरी कामासाठी हेल्पर मुले - मुली पाहिजे. **9820732719** (कांदिवली) {NC251862}

पाहिजे कॉम्प्युटर / ऑफिस स्टाफ, वेब/ग्राफिक्स डिझाईनर्स, हेल्पर, हाऊसकिपिंग **9699924546** {NC251863}

## पाहिजेत

चेंबूरस्थित प्रख्यात इलेक्ट्रिकल सर्व्हिसेस कंपनीला अनुभवी हेल्पर्स त्वरित पाहिजेत. पगार 14000 + पर्क्स. WhatsApp biodata **9892653232** {NC251861}

मुंबई सेंट्रल - DRM ऑफिस साफसफाई करिता माणसे पगार 12000/- आधारकार्ड / लाईटबिल/ रेंट अग्रीमेंट / अॅड्रेसप्रुफ - सकाळी 7 - 4. - मोबाईल - **9869781781** {NC251875}

**पाहिजेत**
**नवीन पनवेल मुंबई येथे अॅग्रो टुरिझम फार्मसाठी अनुभवी**
**किचन हेल्पर कम हाऊस किपींग स्टाफ**
**पाहिजे . राहण्याची आणि जेवणाची सोय केली जाईल. पगार १५,०००/- संपर्क :- (व्हाट्सअॅप कॉल फक्त)**
**9082427905**
**9820607950**

मालाड (ईस्ट) मधील प्रिंटिंग प्रेससाठी हेल्पर कम डिलिव्हरी बॉईज पाहिजे. 12 तास काम पगार 16000/- **9892106609** {NC251876}

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) राहण्याची - खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC251722}

बारावी पास मुले पाहिजेत बाहेरील कामासाठी वय 19 ते 33 विरार ते भाईंदर राहणारे **9969725362 / 9833911797** {NC251912}

बदलापूर येथे घरासाठी 24 तास महिला हेल्पर पाहिजे. **8446201979** {NC251913}

क्लार्क पाहिजेत, सर डी. एस. हायस्कूल अॅड ज्युनिअर कॉलेज ऑफ कॉमर्स (भेटा 2 ते 4), राणीसती मार्ग, पिंपरीपाडा, मालाड (पूर्व), मुंबई - 400097. {NC251911}

मरीनलाईन्स स्टेशनजवळ ऑफिस असिस्टंट SSC मुली पाहिजे. (वय 18-25) पगार 15,000/- संपर्क - **9820338880** {NC251909}

मुलगी/बाई पाहिजे घरकाम/ ऑफिस कामासाठी आणि टायपिंग 40 wpm **9004502451** {NC251910}

घाटकोपर पूर्व येथील रक्तपेढीसाठी कार आणि बाईकसाठी ड्रायव्हर आवश्यक आहेत. इच्छुक उमेदवारांनी **9820144154** वर संपर्क साधावा आणि मुलाखतीसाठी येऊ शकता. {NC251906}

## पाहिजेत

दहिसर (वेस्ट) टेम्पो ड्रायव्हर लोकल डिलिव्हरीकरीता पाहिजेत. संपर्क : **9892029279** {NC251907}

सिक्युरिटीगार्ड पाहिजेत. ठाकुर्ली स्टेशनजवळ 12 तास 10000/- जाधव. **9820849329** {NC251900}

मुलुंड ते दादरपर्यंत खाद्यपदार्थांच्या डिलिव्हरीसाठी डिलिव्हरी बॉय पाहिजे. 'युनिव्हर्सल मार्केटिंग' **9323183731** {NC251901}

सांताक्रुझ पूर्वमध्ये सिनिअर सिटीझनची देखखाल करण्यासाठी सकाळी 8 ते रात्री 8 वाजेपर्यंत आयाबाई पाहिजे. **8422976001** {NC251902}

कांदिवली वेस्टला म्युच्युअलफंड, विमा व्यवसायाच्या बिझनेस डेव्हलोपमेंटसाठी अनुभवी सेल्समेन फिल्डवर्क कामासाठी पाहिजे. अभय - **9223481847** {NC251903}

कोमोरी लिथ्रोन 26 4 कलर मशीनसाठी प्रिंटर, बॉयलर, कटिंग मशीनसाठी बाईंडर, पॅकिंगसाठी मुली अकाऊंटसाठी मुलगा, मुलगी पाहिजेत. श्री साई ग्राफिक्स, युनिट नं. 2, कृष्णा कंपाऊंड, जय श्रीराम कॉम्प्लेक्स जवळ मानकोली नाका, दापोडे भिवंडी, मो. नं. **7208176822 / 33** {NC251904}

प्रिंटींग प्रेस साठी, लॅमिनेशन कटर, बॉयलर हेल्पर पाहिजे. संपर्क - 132, मिलन इंडस्ट्रीयल इस्टेट, काळाचौकी, मुंबई. 400033. {NC251914}

सोलना मॅकेनिकल ऑफसेट प्रिंटिंग मशीनसाठी, प्रिंटर, बॉयलर आणि हार्ड बायडींगसाठी बायंडर पाहिजे. OM PRINTERS, MOB. - **9773984549, 8082190106** {NC250053}

पाहिजेत टॅली - ९ अकाऊंटंस डेटा एन्ट्री ऑपरेटर्स, ऑफिस बॉईज, भेटा - सुनिथा अकाऊंटिंग सर्विसेस ३, सेनम सोसायटी, जीवन विकास मार्ग, सदानंद हॉस्पिटलजवळ कोलडोंगरी, अंधेरी पूर्व, - मोबा - **9082682902** {NC251915}

## Situation Vacant

Borivali (West) required Assistant Tally Accountant 2 years' experience. Resume: **9892797851.** {NC251811}

Required Delivery Boy in Kandivali West. Attractive Salary Contact: **7506725068/ 9869340709** {NC251833}

## Situation Vacant

Wanted Accountant, Peon, Computer Operator, retired person, students, male female **9167683051** {NC251905}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC251851}

## नर्सिंग कोर्स

100% नोकरी देणारे गव्हरमेंट कोर्सेस GNM/ Diploma NURSING, DMLT, PHYSIOTHERAPY, OPERATION THEATRE, INTENSIVE CARE UNIT, XRAY, DIALYSIS ओम इन्स्टिट्यूट, मालाड, मुंबई **8080502190 / 8850530054** {NC250612}

## व्यवसायविषयक

शाळांना लागणारी स्टेशनरी बनवणाऱ्या नामवंत मॅन्युफॅक्चरींग कंपनीला मुंबई/ पालघर जिल्ह्यात कमिशन वरती काम करणारे विश्वासू पुरुष/ महिला पाहिजेत. ज्या ठिकाणी राहता त्याच विभागात काम करून महिन्याला लाखो रुपये कमवण्याची सुवर्णसंधी अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष भेटाः **8693009342/ 9082787983** {NC251443}

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा. अनिरुद्धा- दादर- **8652643434 / 9967437950** {NC251713}

घरबसल्या द्रोण पेपरडिश बनवा. महिना 30 - 35 हजार कमवा दोन वर्षाचे अॅग्रीमेंट - **9028160157** {NC251846}

## वधूवर मेळावा

वधु वर मेळावा सर्वजाती मुलींना फ्री APP कल्याण **9869868620** {NC251837}

## विवाहविषयक

पाहिजे 49 वर्षीय युवकांकरिता कमी शिक्षित, घटस्फोटित, विधवा, असहाय्य युवती **9930979969** {NC251908}

# आयकर कायद्यात बदल नवीन विधेयक सादर होणार

■ नवी दिल्ली

केंद्र सरकारने लोकसभेत फेब्रुवारी महिन्यात सादर केलेले आयकर विधेयक २०२५ परत घेण्याचा निर्णय घेतला. सरकारने १३ फेब्रुवारी २०२५ रोजी हे विधेयक लोकसभेत सादर केले आणि त्याच दिवशी ते तपासणीसाठी निवड समितीकडे पाठवले होते. निवड समितीने २१ जुलै २०२५ रोजी आपला अहवाल लोकसभेत सादर केला. सरकारने निवड समितीच्या जवळपास सर्व शिफारशी मान्य केल्या असून काही सुधारणा सूचनाही स्वीकारल्या आहेत. योग्य कायदेशीर बाबी स्पष्ट करण्यासाठी आवश्यक ते बदल केले जाणार आहेत. भाजपाचे खासदार बैजयंत पांडा यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने केलेल्या बहुतेक शिफारशी समाविष्ट करून सुधारित विधेयकाचा नवा मसुदा सोमवारी ११ ऑगस्ट रोजी लोकसभेत सादर करण्यात येणार आहे.

# विरारच्या एकाच कुटुंबातील ७ जण उत्तराखंडमध्ये अडकले

■ विरार

उत्तराखंडतील गंगोत्री परिसरात ३ दिवसांपूर्वी झालेल्या ढगफुटीमुळे पुरसदृश स्थिती निर्माण झाली. या आपत्तीत विरारमधील एकाच कुटुंबातील ७ पर्यटक अडकले असून त्यांच्याशी कोणताही संपर्क होऊ शकलेला नाही. त्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. विरार पूर्वेतील रहिवासी दीपक कोटकर (५३) हे आपल्या कुटुंबातील ६ सदस्यांसह ३१ जुलै रोजी उत्तराखंडमध्ये पर्यटनासाठी गेले होते. यामध्ये शुभांगी कोटकर (४८), शौनक कोटकर (२४), शर्विल कोटकर (२०), सुरेश येवले (५२), अनिकेत येवले (२५) आणि नयना येवले (४४) अशी या पर्यटन गटातील अन्य सदस्यांची नावे आहेत. या पर्यटकांचा १३ ऑगस्ट रोजी विरारमध्ये परतण्याचा बेत होता. मात्र, गंगोत्री परिसरात झालेल्या ढगफुटीनंतर त्या भागात मोठ्या प्रमाणात पूर आला.

# प्रशासनाशी अरेरावी केल्यास आम्ही जशास तसे उत्तर देऊ

■ पुणे

प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांशी अरेरावी केल्यास आम्हीही तसेच उत्तर देऊ, असा इशारा पुणे पालिका उपायुक्त माधव जगताप यांनी दिला. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या शासकीय बंगल्यातील मौल्यवान वस्तूंच्या चोरीप्रकरणी मनसे कार्यकर्त्यांनी निषेध नोंदविला. आयुक्तांकडून अर्वाच्य भाषा वापरल्याचा आरोप करून कार्यकर्त्यांनी दालनाबाहेर ठिय्या आंदोलन केले. आयुक्तांनी माफी नाकारल्यावर मनसे कार्यकर्ते आक्रमक झाले. पोलिसांनी त्यांना शिवाजीनगर ठाण्यात नेऊन गुन्हा नोंदवला. या घटनेच्या विरोधात महापालिका कर्मचारी वर्गाने काळी फिती बांधून निषेध सभा घेतली. यावेळी पुणे महानगरपालिका उपायुक्त माधव जगताप म्हणाले की, महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी महापालिकेचा पदभार घेऊन जवळपास दोन महिन्याचा कालावधी झाला. ते कार्यालयात येणार्‍या नागरिकांसोबत चांगल्या प्रकारे संवाद साधतात. त्याच दरम्यान नवल किशोर राम यांच्या

### पुणे उपायुक्तांचा इशारा

अध्यक्षतेखाली काल दुपारच्या सुमारास अधिकारी वर्गासोबत बैठक सुरू होती. त्यावेळी काही पदाधिकारी, कार्यकर्ते आतमध्ये येऊन आयुक्तासोबत चुकीच्या पद्धतीची भाषा वापरत होते. तरी आयुक्त चांगल्या प्रकारे संवाद साधत होते. त्यानंतर कार्यकर्त्यांनी जे कृत्य केले. त्याचा मी निषेध व्यक्त करतो.आपण केवळ स्वतःच्या घरासाठी नव्हे तर संपूर्ण शहराच्या हितासाठी, नागरिकांच्या सेवेसाठी काम करत आहोत.

# कल्याणमध्ये इडली हॉटेल चालकाला मनसेकडून चोप

■ ठाणे

कल्याणमध्ये आज पुन्हा एकदा मराठी - अमराठी वाद झाला. कल्याण पूर्व दुर्गामाता मंदिर परिसरात का परप्रांतीय इडली हॉटेल चालकाने मराठी माणसाविरूद्ध शिविगाळ केल्याची ऑडीओ क्लिप व्हायरल झाली होती. या ऑडिओ क्लिपनंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी हॉटेल चालकाला चोप दिला. त्यानंतर हॉटेल चालकाने माफी मागितली. या ऑडिओ क्लिपमध्ये परप्रांतीय हॉटेल चालकाने मराठी माणसांना शिविगाळ केली होती. तसेच अपशब्ददेखील वापरले होते. ही ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर मनसेने या हॉटेल मालकाचा शोध घेतला. त्याला सज्जड दम देत मराठी माणसाची माफीदेखील मागायला लावली. तसेच मराठी ग्राहकांसोबत चांगला व्यवहार करण्याचा सल्ला दिला.

# उत्तरकाशीत ५६६ नागरिकांना वाचवले ! अनेक जण बेपत्ता

■ उत्तरकाशी

उत्तरकाशी जिल्ह्यातील धाराली व हर्षिल या पूरग्रस्त भागातून आज दुपारपर्यंत एकूण ५६६ नागरिकांची सुरक्षितपणे सुटका केली. सुमारे ३०० पेक्षा जास्त नागरिकांचे बचावकार्य सुरू असल्याची माहिती राज्य सरकारने दिली. मात्र अजूनही अनेक जण बेपत्ता आहेत. धाराली व हर्षिल भागात मंगळवारी ५ ऑगस्टला आलेल्या अचानक पुरामुळे जनजीवन विस्कळीत झाले. भारतीय लष्कर आपत्तीग्रस्त भागात श्वान पथक, ड्रोन आणि ग्राउंड-पेनेट्रेटिंग रडार यांच्या सहाय्याने शोध आणि बचाव मोहीम राबवत आहे. मुख्यमंत्री पुष्कर सिंग धामी यांनी राज्यातील प्रमुख बचाव व सुरक्षा यंत्रणांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत उच्चस्तरीय बैठक घेऊन संपूर्ण बचाव व पुनर्वसन कार्याचा आढावा घेतला. ठिकाणी महाराष्ट्रातील १५१ पर्यटक अडकल्याची माहिती आहे.

# उल्हासनगरातील न्यू ईरा इंग्लिश शाळा वादाच्या भोवऱ्यात

■ उल्हासनगर

एकेकाळी नावाजलेली शहरातील न्यू ईरा इंग्लिश प्रायमरी स्कूल ही शाळा सध्या वादाच्या भोवर्यात सापडली आहे. शाळा प्रशासनाने या शाळेतील शिक्षक महिलांना अचानक कामावरून काढले आहे. तर काही शिक्षकांचे वेतन अनेक महिन्यांपासून थकवले आहे. त्यामुळे आता या महिला शिक्षकांनी शाळेच्या गेटसमोरच उपोषण आंदोलन सुरू केले आहे उल्हासनगर कॅम्प ३ परिसरात असलेल्या या शाळेतील महिला शिक्षकांनी पुकारलेल्या या उपोषण आंदोलनाला विद्यार्थी,पालक आणि विविध राजकिय पक्षांकडून वाढता पाठिंबा मिळत आहे. अनुभवी शिक्षकांना काढून टाकल्यामुळे शाळेत नियमित शिकवले जात नाही. याचा थेट परिणाम आमच्या मुलांच्या भवितव्यावर होत आहे,अशी चिंतायुक्त प्रतिक्रिया पालक व्यक्त करत आहेत.शाळा

### शाळेच्या गेटसमोर उपोषण आंदोलन

प्रशासनाने कोणतीही पूर्वसूचना न देता कामावरून दूर केले असल्याचा आरोप या पीडित शिक्षिकांनी केला आहे.त्यांनी 'न्याय मिळेपर्यंत माघार नाही ' अशा घोषणांचे फलक हातात घेऊन शाळेच्या गेटजवळ गेल्या चार दिवसांपासुन शांततापूर्ण पद्धतीने उपोषण आंदोलन सुरू केले आहे.

# आजचे राशी भविष्य

शनिवार दि. ९ ऑगस्ट २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | मनात आनंदी विचार राहतील. एखाद्या समारंभात सहभागी व्हाल. स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घ्याल. |
| वृषभ | दिवसभर थोडी दगदग जाणवेल. नवीन ओळखी होतील. घरामध्ये आनंददायी वातावरण राहील. |
| मिथुन | कार्यक्षेत्रात नवीन संधी उपलब्ध होतील. आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. कुटुंबीयांबरोबर वेळ मजेत घालवाल. |
| कर्क | घरी पाहुणेमंडळींचे आगमन होईल. नातलगांकडून भेटवस्तू मिळतील. स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घ्याल. |
| सिंह | नोकरीमध्ये बढतीचे योग येतील. उत्साहपूर्ण दिवस राहील. नातेवाईकांशी चांगला संवाद राहील. |
| कन्या | तुमच्या हातून उल्लेखनीय कामगिरी होईल. वडीलधाऱ्या मंडळींचे आशीर्वाद लाभतील. चविष्ट भोजन मिळेल. |
| तूळ | आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. नातेवाईकांच्या गाठीभेटी यशस्वी होतील. आजचा दिवस आनंददायी असेल. |
| वृश्चिक | कामे झटपट उरकून टाकण्याकडे कल राहील. आर्थिक लाभ प्राप्त होतील. नातेवाईकांमध्ये रमाल. |
| धनु | ठरवलेल्या योजना यशस्वी होतील. एखाद्या समारंभात सहभागी व्हाल. स्वादिष्ट भोजनात रुची घ्याल. |
| मकर | भेटवस्तू घेण्यासाठी पैसे खर्च कराल. एखाद्या स्नेहसंमेलनाचे आयोजन कराल. स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घ्याल. |
| कुंभ | तुमच्या बोलण्याने अनेक कामे मार्गी लागतील. लोकांचे सहकार्य चांगले मिळेल. कुटुंबीयांमध्ये आनंदाने दिवस घालवाल. |
| मीन | नोकरीतील बदल फायद्याचा ठरेल. घरामध्ये आनंददायी वातावरण राहील. चविष्ट भोजन मिळेल. |

# मेट्रो दुर्घटनेनंतर हायकोर्टाचे सुरक्षा उपाय करण्याचे आदेश

■ मुंबई

भिवंडीत मेट्रो लाईन ५ च्या बांधकामस्थळावर लोखंडी रॉड कोसळल्यामुळे रिक्षातील प्रवासी गंभीर जखमी झाला होता. याप्रकरणी उच्च न्यायालयाने २०२३ साली नेमलेल्या समितीने सुचवलेल्या उपाययोजना तातडीने राबवण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणाच्या सुनावणीत न्या. गिरीश कुलकर्णी आणि न्या. आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने नमूद केले की, बांधकामस्थळांसाठी उपाय सुचवणारी तज्ज्ञ समिती न्यायालयाने नेमली होती. त्यांनी सुचवलेल्या उपाययोजना सार्वजनिक संस्थेने तातडीने अंमलात आणल्या असत्या तर लोखंडी रॉड कोसळून झालेली दुर्घटना टाळता आली असती. या उपाययोजना व्यापक जनहितासाठी आहेत, त्यामुळे त्यांची तातडीने अंमलबजावणी गरजेची आहे.

# निकाल — महाराष्ट्र गजलक्ष्मी शुक्र विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 32 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 08/08/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- : **GL-00 : 7958**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0543 | 2091 | 3214 | 3307 | 5581 | 6726 | 7670 | 7789 | 8581 | 9848 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 2115 | 3153 | 3767 | 4432 | 8789 | 8893 | 9187 | 9596 | 9684 | 9780 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 2425 | 4624 | 4882 | 4974 | 5033 | 5671 | 6617 | 8590 | 8695 | 9288 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| पाचवे बक्षिस रु. 300/- | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0731 | 1490 | 2362 | 3296 | 4278 | 5050 | 6219 | 7396 | 8408 | 9106 |
| 0007 | 0734 | 1522 | 2436 | 3311 | 4343 | 5194 | 6302 | 7419 | 8422 | 9109 |
| 0019 | 0780 | 1707 | 2446 | 3349 | 4450 | 5209 | 6357 | 7544 | 8447 | 9159 |
| 0035 | 0806 | 1713 | 2532 | 3352 | 4457 | 5220 | 6360 | 7578 | 8448 | 9233 |
| 0037 | 0851 | 1719 | 2582 | 3365 | 4459 | 5242 | 6416 | 7626 | 8449 | 9237 |
| 0060 | 0901 | 1781 | 2622 | 3436 | 4460 | 5324 | 6466 | 7666 | 8469 | 9274 |
| 0072 | 0965 | 1834 | 2722 | 3503 | 4488 | 5328 | 6563 | 7670 | 8521 | 9413 |
| 0085 | 1012 | 1835 | 2731 | 3543 | 4493 | 5399 | 6618 | 7745 | 8596 | 9449 |
| 0100 | 1019 | 1857 | 2789 | 3623 | 4554 | 5443 | 6643 | 7747 | 8618 | 9464 |
| 0131 | 1021 | 1860 | 2833 | 3821 | 4561 | 5513 | 6657 | 7789 | 8658 | 9472 |
| 0149 | 1047 | 2068 | 2844 | 3826 | 4640 | 5526 | 6660 | 7793 | 8688 | 9486 |
| 0200 | 1057 | 2159 | 2861 | 3839 | 4672 | 5535 | 6662 | 7821 | 8834 | 9506 |
| 0320 | 1117 | 2163 | 2867 | 3935 | 4704 | 5631 | 6676 | 7871 | 8840 | 9547 |
| 0405 | 1120 | 2177 | 2877 | 3997 | 4718 | 5653 | 6687 | 7878 | 8852 | 9684 |
| 0430 | 1142 | 2237 | 2890 | 4043 | 4815 | 5697 | 6768 | 7880 | 8858 | 9809 |
| 0506 | 1172 | 2261 | 2952 | 4044 | 4846 | 5915 | 6827 | 8025 | 8883 | 9831 |
| 0589 | 1213 | 2266 | 3103 | 4084 | 4861 | 5942 | 6946 | 8089 | 8885 | 9859 |
| 0609 | 1370 | 2287 | 3161 | 4121 | 4913 | 6099 | 7079 | 8207 | 8998 | 9908 |
| 0615 | 1440 | 2299 | 3197 | 4145 | 5015 | 6152 | 7217 | 8214 | 9042 | 9915 |
| 0620 | 1485 | 2322 | 3215 | 4157 | 5035 | 6182 | 7218 | 8320 | 9053 | 9972 |
| 0645 | 1489 | 2357 | 3221 | 4221 | 5036 | 6187 | 7378 | 8345 | 9088 | 9999 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# शुभ राशी दि. ९/०८/२०२५

| | | |
|---|---|---|
| ४ | २ | ७ |
| ४१ | २० | ७० |
| ४६ | २५ | ७५ |
| १४९ | १२९ | १२४ |
| २४८ | ४८० | १६० |

# लॉटरी

## महाराष्ट्र वैभवलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर शुक्रवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 32 • सोडत दिनांक 08/08/2025

पहिले सामाईक बक्षिस रु. 8 लाख : **VL-06 : 4068** — नाझ लॉटरी - रोहा, प्रिन्स एजन्सी - मुंबई यांचा मार्फत

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : **2693** — महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर, श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई

| बक्षिस | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1854 | 3377 | 5282 | 5689 | 5743 | 5996 | 7163 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1311 | 3117 | 3359 | 3807 | 3936 | 6256 | 7558 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1185 | 1856 | 2250 | 3184 | 5480 | 5766 | 7267 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 2037 | 2212 | 2493 | 5735 | 6487 | 7449 | 7958 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1927 | 2302 | 2892 | 3398 | 4142 | 4552 | 5057 | 5589 | 6079 | 6647 | 7072 | 7669 |
| | | 1945 | 2312 | 2913 | 3407 | 4158 | 4554 | 5077 | 5590 | 6083 | 6656 | 7079 | 7693 |
| | | 1965 | 2343 | 2923 | 3454 | 4170 | 4564 | 5101 | 5595 | 6086 | 6660 | 7091 | 7697 |
| 1001 | 1299 | 1970 | 2359 | 2924 | 3481 | 4183 | 4612 | 5125 | 5599 | 6110 | 6665 | 7093 | 7699 |
| 1004 | 1326 | 1980 | 2362 | 2926 | 3531 | 4202 | 4674 | 5133 | 5640 | 6126 | 6667 | 7097 | 7711 |
| 1057 | 1338 | 1987 | 2367 | 2927 | 3533 | 4210 | 4682 | 5142 | 5645 | 6128 | 6687 | 7143 | 7714 |
| 1060 | 1359 | 1991 | 2386 | 2965 | 3537 | 4236 | 4712 | 5166 | 5646 | 6130 | 6691 | 7157 | 7721 |
| 1081 | 1381 | 1999 | 2387 | 2980 | 3550 | 4240 | 4718 | 5176 | 5649 | 6169 | 6703 | 7187 | 7725 |
| 1100 | 1385 | 2025 | 2402 | 2982 | 3560 | 4244 | 4724 | 5182 | 5678 | 6172 | 6732 | 7195 | 7727 |
| 1101 | 1411 | 2026 | 2416 | 3006 | 3634 | 4309 | 4729 | 5187 | 5691 | 6182 | 6744 | 7207 | 7728 |
| 1112 | 1414 | 2028 | 2425 | 3041 | 3695 | 4311 | 4748 | 5195 | 5695 | 6183 | 6757 | 7264 | 7730 |
| 1134 | 1442 | 2039 | 2432 | 3064 | 3703 | 4340 | 4751 | 5204 | 5699 | 6193 | 6761 | 7265 | 7742 |
| 1137 | 1457 | 2062 | 2440 | 3129 | 3711 | 4346 | 4774 | 5210 | 5753 | 6196 | 6766 | 7272 | 7755 |
| 1150 | 1458 | 2069 | 2462 | 3132 | 3730 | 4374 | 4785 | 5229 | 5776 | 6264 | 6767 | 7274 | 7759 |
| 1151 | 1471 | 2078 | 2465 | 3137 | 3737 | 4379 | 4803 | 5250 | 5800 | 6305 | 6786 | 7285 | 7760 |
| 1153 | 1481 | 2100 | 2482 | 3139 | 3739 | 4388 | 4804 | 5252 | 5802 | 6363 | 6796 | 7305 | 7762 |
| 1158 | 1501 | 2123 | 2483 | 3154 | 3788 | 4407 | 4808 | 5258 | 5804 | 6366 | 6797 | 7315 | 7763 |
| 1159 | 1508 | 2147 | 2505 | 3172 | 3793 | 4410 | 4816 | 5270 | 5809 | 6379 | 6806 | 7318 | 7765 |
| 1161 | 1516 | 2152 | 2519 | 3188 | 3807 | 4422 | 4838 | 5285 | 5836 | 6389 | 6815 | 7320 | 7776 |
| 1168 | 1534 | 2163 | 2526 | 3193 | 3830 | 4432 | 4843 | 5316 | 5853 | 6396 | 6834 | 7322 | 7777 |
| 1171 | 1647 | 2172 | 2528 | 3203 | 3843 | 4434 | 4845 | 5340 | 5854 | 6399 | 6846 | 7332 | 7783 |
| 1172 | 1652 | 2185 | 2564 | 3229 | 3846 | 4436 | 4849 | 5349 | 5868 | 6402 | 6855 | 7334 | 7806 |
| 1176 | 1660 | 2205 | 2623 | 3237 | 3854 | 4437 | 4854 | 5380 | 5893 | 6414 | 6856 | 7359 | 7838 |
| 1181 | 1671 | 2213 | 2626 | 3253 | 3884 | 4444 | 4870 | 5396 | 5895 | 6417 | 6864 | 7360 | 7859 |
| 1186 | 1693 | 2215 | 2648 | 3264 | 3893 | 4445 | 4879 | 5424 | 5901 | 6448 | 6872 | 7365 | 7860 |
| 1189 | 1731 | 2220 | 2652 | 3286 | 3905 | 4454 | 4880 | 5430 | 5905 | 6466 | 6900 | 7370 | 7870 |
| 1195 | 1742 | 2221 | 2653 | 3293 | 3911 | 4455 | 4900 | 5458 | 5907 | 6469 | 6911 | 7372 | 7878 |
| 1199 | 1743 | 2223 | 2694 | 3301 | 3926 | 4462 | 4901 | 5480 | 5928 | 6503 | 6913 | 7385 | 7884 |
| 1200 | 1746 | 2225 | 2720 | 3308 | 3949 | 4464 | 4904 | 5522 | 5953 | 6511 | 6918 | 7397 | 7891 |
| 1203 | 1751 | 2233 | 2740 | 3323 | 3954 | 4465 | 4916 | 5526 | 5958 | 6526 | 6919 | 7403 | 7896 |
| 1211 | 1817 | 2239 | 2774 | 3329 | 3956 | 4467 | 4942 | 5528 | 5963 | 6549 | 6921 | 7407 | 7900 |
| 1214 | 1832 | 2242 | 2780 | 3333 | 3964 | 4469 | 4944 | 5537 | 5983 | 6561 | 6967 | 7445 | 7906 |
| 1219 | 1837 | 2248 | 2784 | 3338 | 3979 | 4472 | 4945 | 5540 | 5985 | 6566 | 6992 | 7468 | 7937 |
| 1229 | 1891 | 2252 | 2789 | 3342 | 3982 | 4474 | 4965 | 5544 | 6000 | 6569 | 7009 | 7569 | 7942 |
| 1232 | 1899 | 2258 | 2819 | 3359 | 4030 | 4479 | 4976 | 5558 | 6025 | 6583 | 7019 | 7577 | 7956 |
| 1275 | 1910 | 2266 | 2824 | 3365 | 4039 | 4497 | 4988 | 5569 | 6055 | 6606 | 7025 | 7589 | 7964 |
| 1278 | 1912 | 2281 | 2827 | 3383 | 4058 | 4532 | 5050 | 5575 | 6056 | 6607 | 7047 | 7621 | 7970 |
| 1283 | 1916 | 2288 | 2844 | 3385 | 4074 | 4542 | 5052 | 5581 | 6060 | 6629 | 7063 | 7627 | 7971 |
| 1298 | 1919 | 2289 | 2861 | 3387 | 4140 | 4548 | 5056 | 5588 | 6065 | 6639 | 7068 | 7655 | 7976 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.- मॅनेजर, 'नवाकाळ'

# निकाल — गणेशलक्ष्मी धन विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 32 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 08/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MG-06 : 2051**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 2000/- : 0457, 0542, 3960 (चिराग एन्टरप्रायझेस, नाशिक), 4026 (अंबिका एजन्सी - दादर, मुंबई), 8778

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0851 | 1720 | 2646 | 6314 | 7421 | 9032 | 9077 | 9295 | 9332 | 9616 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0013 | 2914 | 3419 | 4772 | 5876 | 6180 | 6341 | 8062 | 8476 | 8487 |

पाचवे बक्षीस रु. 200/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0076 | 0567 | 1391 | 2116 | 3647 | 4664 | 6074 | 7172 | 7959 | 9267 |
| 0096 | 0601 | 1493 | 2196 | 3722 | 4748 | 6094 | 7233 | 7973 | 9394 |
| 0100 | 0658 | 1495 | 2328 | 3831 | 4914 | 6123 | 7270 | 8005 | 9419 |
| 0101 | 0659 | 1628 | 2342 | 3962 | 4961 | 6245 | 7421 | 8140 | 9595 |
| 0118 | 0727 | 1651 | 2371 | 4154 | 5095 | 6297 | 7441 | 8251 | 9658 |
| 0146 | 0810 | 1679 | 2428 | 4245 | 5193 | 6299 | 7565 | 8267 | 9666 |
| 0147 | 0899 | 1711 | 2866 | 4248 | 5351 | 6562 | 7572 | 8328 | 9680 |
| 0204 | 0998 | 1729 | 2893 | 4337 | 5472 | 6779 | 7675 | 8393 | 9792 |
| 0251 | 1051 | 1778 | 3100 | 4410 | 5563 | 6826 | 7721 | 8533 | 9809 |
| 0260 | 1108 | 1794 | 3133 | 4412 | 5579 | 6850 | 7739 | 8718 | 9824 |
| 0422 | 1118 | 1847 | 3268 | 4447 | 5600 | 7089 | 7779 | 8801 | 9886 |
| 0438 | 1198 | 1855 | 3327 | 4548 | 5739 | 7137 | 7840 | 8844 | 9911 |
| 0520 | 1255 | 2002 | 3344 | 4584 | 5882 | 7163 | 7875 | 8985 | 9956 |
| 0553 | 1271 | 2093 | 3398 | 4654 | 5976 | 7169 | 7935 | 8989 | 9998 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# निकाल — महाराष्ट्र सह्याद्री

महाराष्ट्र राज्य लॉटरी • राजलक्ष्मी विकली लॉटरी • सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 32 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 08/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **SR-06 : 5285** — रॉयल एजन्सी - आंकली

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 1000/- | 1429 | 1453 | 1870 | 2841 | 3733 | 4496 | 5026 | 5288 | 5638 | 5872 |
| तिसरे बक्षिस रु. 500/- | 1653 | 2013 | 2386 | 2588 | 3094 | 3117 | 3181 | 3380 | 4653 | 5186 |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1040 | 2235 | 3487 | 4184 | 5128 |
| 1071 | 2258 | 3567 | 4294 | 5143 |
| 1140 | 2356 | 3598 | 4408 | 5211 |
| 1148 | 2449 | 3631 | 4436 | 5277 |
| 1154 | 2551 | 3636 | 4448 | 5398 |
| 1201 | 2640 | 3684 | 4482 | 5600 |
| 1359 | 2706 | 3886 | 4519 | 5623 |
| 1437 | 2957 | 4021 | 4862 | 5683 |
| 1601 | 3150 | 4049 | 4947 | 5789 |
| 1676 | 3301 | 4075 | 4959 | 5855 |
| 1850 | 3388 | 4076 | 5029 | 5959 |
| 2208 | 3458 | 4101 | 5065 | 5966 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
संपादकीय
नवाकाळ
॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# स्नेह संवर्धन म्हणजेच रक्षाबंधन

**कोणत्याही** प्रकारचे संवर्धन करायचे असेल तर त्यासाठी कोणत्या ना कोणत्या प्रकारचे बंधन असावे लागते. बंधन याचा अर्थ की ज्यामधून समाजाची किंवा व्यक्तीची सर्वार्थाने प्रगती होईल. विकास होईल आणि समाजातील सभ्यता संस्कृती टिकून राहील. संस्कृतीचेही संवर्धन करायचे असेल तर त्यासाठी सुद्धा अनेक प्रकारच्या परंपरांचे बंधन आवश्यक असते. यामधून समाजाची जीवनमूल्ये टिकून राहतात आणि व्यक्तिगत स्तरावर या नीती मूल्यांचा पाया देखील भक्कम होत राहतो. आज भारतीय संस्कृती या जीवनमूल्यांच्या आधारावर टिकून आहे. आजचा हा रक्षाबंधनाचा म्हणजेच राखीपौर्णिमेचा दिवस हा सुद्धा अशाच चांगल्या पवित्र परंपरांचे बंधन पाळून साजरा होत असलेला एक मोठा विशिष्ट सण म्हणता येईल. दरवर्षी त्याच पद्धतीने साजरा होणारा राखी पौर्णिमेचा दिवस संपूर्ण देशभर एका समान उत्साहाने साजरा होतो. त्यातून तिला जाणारा संदेश कितीतरी पिढ्यांचेही संवर्धन करणारा ठरतो. बहिणीने भावाला राखी बांधणे एवढ्यापुरताच त्याचा मर्यादित अर्थ नाही यामधून उभी राहणारी कुटुंबव्यवस्था, व्यक्तिगत स्तरावरचे प्रेम, स्नेह आणि आदर कृतज्ञता या गोष्टी सुद्धा आपोआप प्रत्येक व्यक्तीच्या मनावर गोंदवल्या जातात. म्हणूनच हे संस्कारांचे बंधन आहे ते बंधन टिकवल्यामुळेच भारतीय संस्कृतीचा ध्वज आजही जगामध्ये उंच डौलाने फडकताना दिसतो. इतर संस्कृती लयाला गेल्या तरी सुद्धा भारतीय संस्कृती का टिकून आहे याची जी वेगवेगळी अनेक कारणं आहेत त्यामध्ये ही सण उत्सवांची परंपरा प्रामुख्याने लक्षात घ्यावी लागते. आजच्या दिवशी घराघरांमध्ये भाऊ बहिणी विषयीचे प्रेम तर व्यक्त होईलच परंतु या निमित्ताने भारताच्या कुटुंब व्यवस्थेने टिकवून ठेवलेली एक परंपरा सहजपणे लक्षात येते. कारण या राखी पौर्णिमेतून घडवला जाणारा संस्कार हा जबाबदारी आणि कर्तव्यांची जाणीव करून देतो. एकमेकांविषयी प्रेम असणे, एकमेकांविषयी आदर, या गोष्टी तर त्यातून व्यक्त होतातच. परंतु एकमेकांच्या संरक्षणाची, एकमेकांना मदत करण्याची आणि एकमेकांविषयी आपुलकी ठेवण्याची तेवढीच नैतिक जबाबदारी आपल्यावर आहे याची जाणीव या रक्षाबंधनाच्या निमित्ताने लक्षात आणून दिली जाते. ती अगदी सहज सोप्या पद्धतीने सांगितली गेली आहे.

**कुटुंब व्यवस्था आणि जीवनमूल्य**

राखी बांधायची आणि भावाला ओवाळायचे एवढ्या पुरता जरी तो छोटासा उपचार असला तरी त्यातून घडणारा संस्कार साधारण स्वरूपाचा ठरत नाही. कारण हीच भावा बहिणींची जोडी पुढे याच समाजातला एक जबाबदार नागरिक होत असतात. ते देखील गृहस्थ जीवण जगतात आणि त्यांच्याही संसारामध्ये पुन्हा हीच परंपरा चालू ठेवली जाते. कारण यावरून प्रेमाचे वात्सल्याचे संवर्धन होते आणि एकमेकांना मदत करण्याचा भाव अधिक घट्ट होत राहतो. आपण समाजामध्ये वावरताना एकमेकांचे काही देणे लागतो हे जसे महत्वाचे ठरते तसे त्याची सुरुवातदेखील कुटुंबातून होत असते. कुटुंबामधल्या प्रत्येक व्यक्तीविषयी व्यक्त होत असलेला हा छोटासा आदर ,. एकमेकांमधला स्नेहभाव जबाबदारीची फार मोठी जाणीव करून देत असतो. पौराणिक कथांमधून या रक्षाबंधनाचे वेगवेगळे महत्त्व सांगितले जाते. परंतु आजच्या काळाच्या संदर्भात आणि एकूण त्यामधला व्यापक उद्देश जर लक्षात घेतला तर प्रामुख्याने समाजामध्ये वावरताना किंवा कुटुंबामध्ये राहत असताना ज्या जीवनमूल्यांची आवश्यकता आहे ती जीवनमूल्य टिकवून ठेवणे हाच त्यांचा खरा उद्देश लक्षात घेतला पाहिजे .व्यापक अर्थाने तो समाजातही टिकवून ठेवला पाहिजे. समाजामध्ये वावरताना सुद्धा एकमेकांविषयीची कृतज्ञता किंवा एकमेकांविषयीचा आदरभाव, प्रेम या गोष्टी देखील आवश्यक असतात आणि त्यावरच समाजाची सभ्यतासुद्धा टिकून असते. आज अन्य देशांमध्ये कुटुंब व्यवस्था भारता इतकी भक्कम नाही .भारताच्या कुटुंब व्यवस्थेला मिळालेला हा संस्कारांचा आधार खऱ्या अर्थाने जीवन मूल्यांचे संवर्धन करणारा ठरतो. म्हणूनच रक्षाबंधनासारख्या सणाचा विचार करताना त्यातले जे महत्त्वाचे रक्षा सूत्र आहे. ते असेच आहे की स्नेह संवर्धन करणारा हा रक्षाबंधनाचा उत्सव आहे.

**कर्तव्यांचे स्मरण**

बंधन या शब्दांमधून राखी बांधणे हा जरी अर्थ व्यक्त होत असला तरी बंधन याच शब्दांमध्ये दुसरा अर्थ जो दडलेला आहे तो म्हणजे आपल्यावर असलेल्या काही संस्कारांचे किंवा नियमांचे, कर्तव्यांचे पालन करण्याची जबाबदारी त्यातून व्यक्त होत असते. म्हणूनच शतकानुशतके सुरू असलेली ही परंपरा आज जेव्हा भारतामध्ये पाहायला मिळते त्यावेळेला खरोखरच छोट्या छोट्या सणवारांमधून घरच्या उत्सवांमधून व्यक्तिगत स्तरावर मनाचा विचार केला गेला आहे आणि सामाजिक स्तरावर सामाजिक व्यवस्थेचा आधार दिल्याचे पाहायला मिळते. म्हणजे कुटुंबातल्या संस्कारांमधून समाज व्यवस्थेचा आधार मजबूत करण्याची ही परंपरा एका छोट्या छोट्या उपक्रमांमधून परंतु तितक्याच कौशल्याने आणि कल्पकतेने साकार करण्याचा प्रयत्न होत आलेला आहे आणि म्हणूनच यासाठीच ही सणपरंपरा साधारण स्वरूपाची ठरत नाही. आज कोणताही सण साजरा करताना त्यातले धार्मिक कर्मकांड किंवा त्यामागचा परंपरेने चालत आलेला उपचार जरी लक्षात घेतला तरी सुद्धा त्यामध्ये दडलेला व्यापक अर्थ आपल्याला दुर्लक्षित करून चालणार नाही अनेक वेळेला आपण या सगळ्या परंपरांना जुनाट किंवा बुरसटलेला म्हणून बाजूला ठेवण्याचा प्रयत्न करतो. परंतु व्यक्तीच्या मनाची ठेवण लक्षात घेऊन त्या मनाला देखील आनंदी ठेवण्याचा त्याच्यातला उत्साह टिकून ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. सामाजिक स्तरावर हाच उत्साह मोठी ऊर्जा देणारा ठरतो आणि आत्मविश्वासही वाढवत असतो. हा दृष्टिकोन सणांमधल्या सौहार्दतेचे फार मोठे निदर्शक ठरतो.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११


**लढायचं असेल तर जगाबरोबर लढा , आपल्या माणसांबरोबर नाही, कारण आपल्या माणसांबरोबर जगायचं असतं, लढायचे नाही.**

## पंचांग

**शनिवार, ९ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**

**श्रावण पौर्णिमा**
**नक्षत्र : श्रावण**





**रवी उदय- ०६-१९**
**रवी अस्त- १९-०९**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० मकर**

**रक्षाबंधन; हयग्रीवोत्पत्ती; शामाकाग्रयण; ऋक् शुक्ल यजु: हिरण्यकेशी तैत्तिरीय श्रावणी; अश्वत्थ मारुती पूजन; पौर्णिमा समाप्ती दुपारी १.२४, ऑगस्ट क्रांती दिन**

## पाककृती



## पनीर शॉरमा



★ **साहित्य** - पनीर, दही, कांदा, टोमॅटो, लसूण, लिंबाचा रस, भाजलेले तीळ, मेयोनीज, चिली फ्लेक्स, लाल तिखट, हळद, धणे पावडर, गरम मसाला, जिरे पावडर, काळी मिरी, ऑलिव्ह ऑईल, मीठ.

★ **कृती** - प्रथम पनीर मॅरिनेट करावे लागेल. यासाठी दही, तिखट, बारीक चिरलेला कांदा, बारीक चिरलेला लसूण, चिली फ्लेक्स, मीठ, जिरेपूड, धनेपूड, काळी मिरी, गरम मसाला, हळद, लिंबाचा रस, ऑलिव्ह ऑईल नीट मिक्स करून घ्या. नंतर त्यात पनीर घालून काही वेळ मॅरिनेट करण्यासाठी ठेवा. किमान २० ते ३० मिनिटे मॅरिनेट करा. आता सॉस तयार करा. यासाठी तीळ, लसूण, काळी मिरी, मीठ, ऑलिव्ह ऑईल, लिंबाचा रस आणि मेयोनीज चांगले मिक्स करा. आता एक पोळी घ्या. नंतर त्यावर हा सॉस चांगला पसरवा. त्यावर मॅरिनेट केलेले पनीर ठेवा आणि नंतर त्यावर कांदा, सिमला मिरची, टोमॅटो टाका आणि नंतर पोळीच्या दोन्ही बाजू झाकून घ्या. तुम्ही पोळी भाजून देखील त्यावर भाज्या आणि पनीर टाकू शकता. तुमचा पनीर शॉरमा तयार आहे.

# नॅशनल बँक टेनिस ओपन स्पर्धा बेन शेल्टन आणि व्हिक्टोरियाला विजेतेपद

**नॅशनल बँक टेनिस ओपन स्पर्धेच्या पुरुष एकेरीत अमेरिकेचा बेन शेल्टनने रशियाच्या ११ व्या मानांकित करेन खाचानोव्हचा ६-७ (५),६-४,७-६ (३)असा पराभव केला आणि या स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.महिला एकेरीत कॅनडाच्या व्हिक्टोरिया म्बोकोने नाओमी ओसाकाला तीन सेटच्या सामन्यात २-६,६-४,६-१ ने हरवून विजेतेपद जिंकले.**





■ टोरोंटो

शेल्टन २००३ मध्ये अँडी रॉडिकनंतर मास्टर्स १००० हार्ड-कोर्ट स्पर्धा जिंकणारा पहिला अमेरिकन खेळाडू ठरला. या विजयामुळे शेल्टन जागतिक क्रमवारीत कारकिर्दीतील सर्वोत्तम सहाव्या स्थानावर पोहोचेल. पुरुष दुहेरीच्या अंतिम सामन्यात ज्युलियन कॅश आणि लॉयड ग्लासपूल यांनी जो सॅलिसबरी आणि नील स्कुप्सकी यांचा ६-३,६-७ (५),१३-११ असा पराभव केला.व्हिक्टोरिया म्बोकोने तिचे स्वप्नवत अभियान सुरू ठेवले आणि तिने पहिला सेट गमावल्यानंतर शानदार पुनरागमन केले आणि चार वेळा ग्रँड स्लॅम विजेती ओसाकाला २-६, ६-४, ६-१ असे हरवून तिचे पहिले विजेतेपद जिंकले.या विजयासह ती जागतिक क्रमवारीत ८५ व्या स्थानावरून २५ व्या स्थानावर जाईल. हे विजेतेपद जिंकणारी व्हिक्टोरिया ही तिसरी कॅनडाची खेळाडू बनली.तिच्या आधी १९६९ मध्ये फेय अर्बन आणि २०१९ मध्ये बियांका अँड्रीस्कूने ही कामगिरी केली होती. वाइल्ड कार्डद्वारे या स्पर्धेत प्रवेश मिळवणाऱ्या व्हिक्टोरियाला संपूर्ण सामन्यात प्रेक्षकांचा पूर्ण पाठिंबा मिळाला. व्हिक्टोरिया ही डब्ल्यबटीए १००० विजेतेपद जिंकणारी वाईल्ड कार्डद्वारे प्रवेश मिळवणारी तिसरी खेळाडू ठरली.तिच्या आधी मारिया शारापोव्हाने २०११ मध्ये सिनसिनाटीमध्ये आणि अँड्रीस्कूने २०१९ मध्ये इंडियन वेल्समध्ये विजेतेपद जिंकले होते.एक वर्षापेक्षा जास्त काळ खेळापासून दूर राहिल्यानंतर गेल्या महिन्यात पुनरागमन करणारी व्हीनस विल्यम्स सिनसिनाटी ओपन टेनिस स्पर्धेच्या पहिल्या फेरीत स्पेनच्या जेसिका बुजास मानेरोकडून ६-४.६-४ असा पराभव पत्करून बाहेर पडली होती.

## भारत घरच्या मैदानावर विंडिज, द.आफ्रिकेशी कसोटी खेळणार

■ मुंबई



भारताने इंग्लंडमधील ५ कसोटी सामन्यांची मालिका २-२ अशी बरोबरीत सोडवली आणि वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत तिसरे स्थान मिळवले.भारताचे २८ गुण आहेत. भारताला या वर्षी घरच्या मैदानावर वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध कसोटी मालिका खेळायच्या आहेत. दोन्ही मालिकांमध्ये विजय मिळवून संघ टॉप-२ संघांमध्ये स्थान मिळवू शकतो. भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिकेने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचे नवीन चक्र सुरू झाले.या काळात वेस्ट इंडिजने ऑस्ट्रेलियासोबत मालिका खेळल्या आणि श्रीलंकेने घरच्या मैदानावर बांगलादेशसोबत मालिका खेळल्या.न्यूझीलंड,पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिकेच्या संघांना आतापर्यंत एकही मालिका खेळता आलेली नाही. ऑस्ट्रेलिया ३ कसोटी विजयातून १०० टक्के गुणांसह पहिल्या क्रमांकावर आहे.श्रीलंका १ विजय आणि १ अनिर्णित सामन्यातून ६७ टक्के गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे.भारत तिसऱ्या क्रमांकावर, इंग्लंड ४ व्या क्रमांकावर,बांगलादेश ५ व्या क्रमांकावर आणि वेस्ट इंडिज ६ व्या क्रमांकावर आहे.

## पाकिस्तानी खेळाडू हैदरला बेकेनहॅम मैदानावरुन अटक

■ लंडन

बलात्कारप्रकरणी पाकिस्तानचा खेळाडू हैदर अलीला बेकेनहॅम मैदानावरून ग्रेटर मँचेस्टर पोलिसांनी अटक केली. तो पाकिस्तान शाहीनसोबत इंग्लंडच्या दौऱ्यावर होता. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने त्याला सध्या निलंबित केले. पोलिसांनी त्याचा पासपोर्ट जप्त केला. त्याला जामीनावर सोडण्यात आले.ते तपासात सहकार्य करतील आणि हैदरला खटला लढण्यास पाठिंबा देतील, असे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने सांगितले.

## दुलीप ट्रॉफी!शुभमन गिल उत्तर विभागाचे, ध्रुव जुरेल मध्य विभागाचे नेतृत्व करणार

■ मुंबई



इंग्लंड दौऱ्यावरून परतल्यानंतर भारतीय कर्णधार शुभमन गिल देशांतर्गत क्रिकेट खेळताना दिसणार आहे.त्याला देशांतर्गत हंगामातील पहिली स्पर्धा असलेल्या दुलीप ट्रॉफीसाठी उत्तर विभागाचे कर्णधारपद सोपविले. त्यासोबत भारतीय यष्टिरक्षक ध्रुव जुरेलकडे मध्य विभागाचे कर्णधारपदाची जवाबदारी दिली. गेल्या आठवड्यात भारतीय सलामीवीर यशस्वी जैस्वालला पश्चिम विभागाचा कर्णधार बनवण्यात आले होते, तर गोलंदाजी अष्टपैलू शार्दुल ठाकूरला पश्चिम विभागाची कमान देण्यात आली.मुंबई इंडियन्सचा फलंदाज तिलक वर्मा दुलीप ट्रॉफीमध्ये दक्षिण विभागाकडून खेळेल आणि संघाचे नेतृत्वही करेल.दुलीप ट्रॉफी २८ ऑगस्टपासून सुरू होणार आहे. शेवटचा दुलीप ट्रॉफीचा किताब मयंक अग्रवालच्या नेतृत्वाखाली इंडिया अ संघाने जिंकला होता. अंतिम फेरीत टीमने इंडिया क संघाचा १३२ धावांनी पराभव केला.गिल उत्तम फॉर्ममध्ये आहे, इंग्लंडमध्ये त्याने ४ शतके झळकावली.इंग्लंडविरुद्धच्या ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेत त्याने ४ शतकांसह ७५४ धावा केल्या.त्याच्या संघात आयुष बदोनी,यश धुल, अर्शदीप सिंग, हर्षित राणा आणि अंशुल कंबोज असे खेळाडू आहेत.उत्तर विभागाचा पहिला सामना पूर्व विभागाविरुद्ध असेल.जो २८ ते ३१ ऑगस्ट दरम्यान बंगळुरू येथील बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्स ग्राउंडवर खेळला जाईल.

## आशिया क्रिकेट चषकातून यष्टीरक्षक ऋषभ पंत बाहेर

■ नवी दिल्ली

दुखापतग्रस्त यष्टीरक्षक ऋषभ पंतला आशिया क्रिकेट चषक आणि वेस्ट इंडिजविरुद्ध होणाऱ्या कसोटी मालिकेतून बाहेर पडला.त्यामुळे त्याच्या चाहत्यांना एकच धक्का बसला आहे. मँचेस्टरमधील ओल्ड ट्रॅफर्ड मैदानावर २३ते २७ जुलैदरम्यान चौथा कसोटी सामना खेळला गेला.या सामन्यात फलंदाजी करत असताना क्रिस वोक्सच्या गोलंदाजीवर ऋषभ पंतला गंभीर दुखापत झाली होती. तेव्हा तो तत्काळ मैदानाबाहेरही गेला होता. या सामन्यात त्याने लंगडत लंगडत फलंदाजी केली. मात्र यष्टीरक्षणासाठी तो मैदानात उतरला नाही. त्याला जवळपास सहा आठवड्यांची विश्रांती घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. असे असताना ९सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या आशिया चषकामध्ये ऋषभ पंत खेळणार नाही.

## जागतिक सांघिक बुद्धिबळ स्पर्धेत चेन्नईच्या वेलाम्मल विद्यालयाला सुवर्ण

■ नवी दिल्ली

सर्वांत तरुण जागतिक विजेता डी.गुकेश आणि ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंद यांची शाळा असलेल्या चेन्नईच्या वेलाम्मल विद्यालयाने अमेरिकेच्या व्हर्जिनिया येथे झालेल्या जागतिक शालेय सांघिक बुद्धिबळ स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. मोगप्पैर परिसरात असलेल्या वेलाम्मल विद्यालयाची चेन्नईतील बुद्धिबळ क्रांतीमागील शक्ती म्हणून कौतुक केले जात आहे. आठ रोमांचक फेऱ्यांनंतर वर्ल्ड स्कूल्स टीम चॅम्पियनशिप अलेक्झांड्रिया, व्हर्जिनिया येथे संपली,असे जागतिक बुद्धिबळ प्रशासकीय संस्था फिडेने जाहीर केले.वेलाम्मल विद्यालयाचा प्रणव के.पी.जो पाचव्या पटावर खेळला आणि दुसऱ्या पटावरील इमांगली अखिलबे (कझाकस्तान एनएसपीएम) आणि एडिसा बर्डिबाएव्हा (कझाकस्तान एनएसपीएम) यांनी परिपूर्ण गुण (८पैकी ८) नोंदविले.एकंदरित वेलाम्मल विद्यालयाने त्यांचे आठ सामने १६गुणांसह पूर्ण केले.

## बीओबी बॅडमिंटन स्पर्धेत हनुमंत, लोचना विजेते

■ मुंबई




बँक ऑफ बडोदा-बीओबी मुंबई विभागीय निवड चाचणी बॅडमिंटन स्पर्धेमध्ये पुरुष गटात हनुमंत सुद्रिक आणि महिला गटात लोचना जांभूळकर विजेते ठरले. बँक ऑफ बडोदा-मुंबई विभागातर्फे आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी सहकार्याने झालेल्या दादर पश्चिम येथील बॅडमिंटन स्पर्धेत सर्वांगसुंदर खेळ करीत हनुमंत सुद्रिकने रवी कुमारचे आव्हान २१-१४ असे संपुष्टात आणले आणि विजेतेपदाला गवसणी घातली.बँक ऑफ बडोदा-मुंबई क्रीडा विभागाचे प्रदीप सुरोशे व शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण यांनी विजेते-उपविजेत्यांचे अभिनंदन केले. तत्पूर्वी झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात डावाच्या मध्यापर्यंत आघाडी घेणाऱ्या अजिंक्य नवगिरेला प्रथम मानांकित हनुमंत सुद्रिकने २१-१८ असे नमविले. दुसऱ्या उपांत्य सामन्यात रवी कुमारने ऋग्वेद फर्डेचा २१-१२ असा पराभव केला.महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात प्रारंभापासून मोठी आघाडी घेत लोचना जांभूळकरने गरिमा श्रीवास्तवला १५-७ असे हरवून अजिंक्यपदावर शिक्कामोर्तब केला. उपांत्य सामन्यात लोचना जांभूळकरने पूजा मोरेवर १५-११ असा तर गरिमा श्रीवास्तवने प्रियांका उपाध्यायवर १५-१२ असा विजय मिळविला.अखिल भारतीय स्तरावर भोपाळ येथे होणाऱ्या बँक ऑफ बडोदा आंतर विभाग बॅडमिंटन स्पर्धेसाठी मुंबई विभागाच्या पुरुष संघाचे हनुमंत सुद्रिक, रवी कुमार, अजिंक्य नवगिरे, ऋग्वेद फर्डे आणि महिला संघाचे लोचना जांभूळकर,गरिमा श्रीवास्तव,पूजा मोरे,प्रियांका उपाध्याय आदी खेळाडू प्रतिनिधित्व करणार आहेत. स्पर्धेत एकूण ४१ खेळाडू सहभागी झाले होते.

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)



# ज्येष्ठ दिग्दर्शक मेहबूब खान

**आर्थिक विषमता आणि त्यातून निर्माण झालेले सर्वसामान्यांचे अस्तित्वाचे प्रश्न हिंदी चित्रपटांमधून प्रभावीपणे मांडणारे पहिले दिग्गज दिग्दर्शक म्हणून मेहबूब खान यांचे नाव आजही घेतले जाते. तसेच भारतातील पूर्ण लांबीचा, पहिला रंगीत चित्रपट 'आन' निर्माण करण्याचे श्रेयही त्यांना दिले जाते. अफगाणिस्तानातून आलेल्या पठाण पूर्वजांच्या घराण्यात त्यांचा झाला. मेहबूब खान यांचे पूर्ण नाव मेहबूब खान रमझान खान. वडिलांची आर्थिक परिस्थिती यथातथाच. जुजबी शिक्षण झाले आणि त्या काळात त्यांना चित्रपटांचे आकर्षण होते.**

त्यांच्या गावचे म्हणजे बिलिमोराचे नूर मोहम्मद अली मोहम्मद शिप्रा यांचा मुंबईत एक मोठा घोड्यांचा तबेला होता. या तबेल्यातले घोडे चित्रपटांच्या चित्रीकरणासाठी भाड्याने देण्याचा व्यवसाय हा नूर मोहम्मद करीत असे. मेहबूब खानचा आणि नूर मोहम्मदचा चांगला परिचय होता. या गरीब घरच्या मुलाला काही कामधंद्याला लावावे म्हणून तो तरुण मेहबूब खानला मुंबईला घेऊन गेला आणि आपल्या तबेल्यात घोड्यांना नाल लावण्याच्या कामासाठी त्याला नोकरीस ठेवले. मेहबूब खान अनेक वेळा सिनेमा शूटिंगच्या ठिकाणी घोडे घेऊन जाई आणि स्टुडिओच्या लोकांशी गप्पा मारताना शूटिंगसंबंधात काही सूचना बोलून दाखवत असे. चंद्रशेखर या दाक्षिणात्य चित्रपट दिग्दर्शकाला या तरुण मुलाच्या कल्पनाशक्तीबद्दल, हरहुन्नरी स्वभावाबद्दल मोठे अप्रूप होते. चंद्रशेखरने नूर मोहम्मद, ज्याच्याकडे मेहबूब नोकरीला होता त्यांना सुचवले की, हा मुलगा गुणी आहे. याला माझ्याकडे शूटिंगसाठी नोकरीस पाठवले तर हा मोठी प्रगती करेल. नूर मोहम्मदने मान्यता दिल्यावर मेहबूब खान चंद्रशेखरांकडे स्टुडिओतल्या किरकोळ कामांसाठी नोकरीस लागला. त्याच्या अंगच्या गुणांनी प्रगतीचे एक एक टप्पे गाठत मेहबूब खान लवकरच चंद्रशेखरांचा सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम करू लागला. मेहबूब खान चंद्रशेखरांचा सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम करीत असताना अर्देशीर इराणींच्या इंपीरियल फिल्म कंपनीत एक्स्ट्रा म्हणूनही काम करीत असे. ते दिवस मूक चित्रपटांचे होते. मेहबूब खान पुढे मुंबईला येऊन हिंदी चित्रपटसृष्टीत स्थिरावले. एक नामांकित चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माता म्हणून विख्यात झाले. मेहबूब खान यांना 'जजमेंट ऑफ अल्लाह' (१९३५) या चित्रपटाद्वारे दिग्दर्शनाची पहिली संधी प्राप्त झाली. पुढे डेक्कन क्वीन (१९३६), एक ही रास्ता





(१९३९), औरत (१९४०) हे चित्रपट त्यांनी सागर मूव्हीटोन आणि नॅशनल स्टुडिओसाठी दिग्दर्शित केले. १९४० साली त्यांनी दिग्दर्शित केलेला 'औरत' प्रचंड गाजला. याच 'औरत'ची रंगीत पुनर्निर्मिती त्यांनी 'मदर इंडिया'द्वारे १९५६ मध्ये केली. 'मदर इंडिया' हिंदी चित्रपट क्षेत्रात गुणवत्तेचा मापदंड मानला गेला!

१९४५ साली मेहबूब खानंनी 'मेहबूब प्रॉडक्शन्स' ही स्वत:ची निर्मिती संस्था आणि स्टुडिओ स्थापन केला. डाव्या विचारसरणीकडे कल असलेल्या मेहबूब खान यांच्या संस्थेचे 'विळा कोयता' हे बोधचिन्ह प्रसिद्ध होते. त्यांच्या चित्रपट कारकिर्दीत त्यांनी अनमोल घडी, मदर इंडिया, आन, अमर, अंदाज वगैरे सात चित्रपटांची निर्मिती केली तर चोवीस चित्रपटांचे दिग्दर्शन केले, चार चित्रपटांत छोटीशी भूमिका केली आणि दोन चित्रपटांचे पटकथा लेखनही केले! मेहबूब खानांच्या मार्गदर्शनाखाली आपली अभिनयाची कारकीर्द सुरुवात करणारे अनेक अभिनेते, अभिनेत्री पुढे मोठे दिग्गज कलावंत म्हणून उदयाला आले. त्यात सुरेंद्र, दिलीपकुमार, सुनील दत्त, राजकुमार, राजेंद्रकुमार, राज कपूर, नर्गिस, निम्मी, नादिरा यांचा समावेश आहे. त्यांनी निर्मिती केलेला, १९६२ साली प्रदर्शित 'सन ऑफ इंडिया' हा अखेरचा चित्रपट. अर्थपूर्ण चित्रचौकटी, लोकसंगीताचा सुयोग्य वापर, सामान्य प्रेक्षकाला सहज पचनी पडेल असे सादरीकरण ही त्यांची वैशिष्ट्ये. 'मदर इंडिया' या त्यांच्या चित्रपटाला १९५८ सालचा उत्कृष्ट चित्रपट दिग्दर्शनाचा पुरस्कार मिळाला. २००७ साली त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त टपाल खात्याने त्यांचे तिकीट प्रसिद्ध केले. मेहबूब खान यांचे २८ मे १९६४ रोजी निधन झाले. आदल्याच दिवशी पंडित जवाहरलाल नेहरू यांचे निधन झाले. या धक्क्याने मेहबूब खानांचे प्राणोत्क्रमण झाले असे म्हटले जाते. ■■■

## शिवाजीनगर आगारात पीएमपीएल बसला आग

■ पुणे

**पुण्याच्या** शिवाजीनगर येथील नरवीर तानाजी वाडी (वाकडेवाडी) पीएमपीएल आगारात आज पहाटे साडेपाच वाजताच्या सुमारास बसला आग लागली. या आगीत बस जळून खाक झाली. बसला आग लागल्याची माहिती कसबा पेठ अग्निशमन केंद्राला मिळाली.

त्यानंतर घटनास्थळी तत्काळ अग्निशमन दलाचे पथक दाखल झाले. त्यांनी पाण्याचा मारा करून आग नियंत्रणात आणली. या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा इजा झाली नसल्याची माहिती अग्निशमन दलाचे केंद्रप्रमुख कमलेश चौधरी यांनी दिली.

## नवी मुंबईच्या उलवेतील प्रस्तावित बालाजी मंदिराला लवादाची परवानगी

■ नवी मुंबई

**नवी मुंबईतील** उलवे येथे तिरुमला तिरुपती देवस्थानच्यावतीने (टीटीडी) उभारण्यात येणाऱ्या तिरुपती बालाजी मंदिराच्या विरोधात पर्यावरणवादी कार्यकर्त्यांने दाखल केलेली याचिका राष्ट्रीय हरित लवादाने (एनजीटी) फेटाळून लावली असून, मंदिराच्या बांधकामाला परवानगी दिली आहे.

या मंदिराच्या उभारणीमुळे किनारपट्टी नियमनाचे (सीआरझेड) उल्लंघन होणार असून, परिसरातील जीवसृष्टी, कांदळवने आणि पाणथळ जमिनी नष्ट होणार आहेत, असा आक्षेप घेत मंदिराच्या उभारणीविरोधात हरित लवादासमोर याचिका दाखल करण्यात आली होती.

मात्र टीटीडीच्या वतीने शपथपत्रावर असे सांगण्यात आले की, ज्या ठिकाणी मंदिराची उभारणी करण्यात येणार आहे तो भाग किनारपट्टी नियमनाअंतर्गत येत नाही. त्यामुळे नियमाचे उल्लंघन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच भविष्यात या ठिकाणी काही बांधकाम करायचे झाल्यास संबंधित प्राधिकरणाकडून रितसर परवानगी घेतली जाईल, असेही टीटीडीच्या वतीने लवादासमोर सांगण्यात आले. त्यामुळे लवादाने याचिका फेटाळून लावली.

## एक रुपयाही घेतला नाही! अनिल पवारांचा ईडीपुढे दावा

■ विरार

**आपल्या** कारकिर्दीत आपण कोणाकडून एक रुपयाही घेतला नाही, असा दावा वसई-विरार महानगरपालिकेचे माजी आयुक्त अनिल पवार यांनी केला आहे. सक्तवसुली संचालनालयाकडून सध्या त्यांची चौकशी सुरू असून या चौकशीत त्यांनी हा दावा केला आहे.

अनिल पवार म्हणाले की, वसई-विरार भागातील



खासगी व सरकारी जमिनींवरील बेकायदा बांधकामे काही पालिका अधिकारी व खासगी विकासक यांच्या संगनमताने झाली आहेत. मी २०२२ मध्ये आयुक्तपदाचा कार्यभार घेतला. वादग्रस्त बांधकामे ही २००८-०९ ते २०११-१२ दरम्यानची आहेत. त्यावेळचे नगर विकास खात्याचे उपसंचालक वाय. एस. रेड्डी हे त्यासाठी जबाबदार आहेत. त्यांनी बिल्डींग परमिट क्रमांकांचा गैरवापर करून अनेकांना बनावट काम सुरू करण्याची प्रमाणपत्रे दिली. यातील अनेक जागा या सार्वजनिक वापरासाठी आरक्षित ठेवण्यात आल्या होत्या. मी यातील कोणत्याही कामासाठी एक रुपयाही घेतलेला नाही. ईडीने माझ्या घराची झडती घेतली तेव्हाही त्यांना कोणतीही बेकायदेशीर रोकड किंवा मालमत्ता आढळली नव्हती. २०१६ मध्ये शिवसेना नगरसेवक धनंजय गावडे यांनी रेड्डीच्या विरोधात तक्रार केल्यानंतर हे प्रकरण पुढे आले. यातील कोणत्याही प्रकरणाशी आपला काहीही संबंध नाही. उलट आपल्या कार्यकाळात ४१ अनधिकृत इमारती जमीनदोस्त करण्यात आल्या. त्यानंतर त्यांच्यावर हे आरोप सुरू झाले.

## अखेर थेरोंडा-पालव गावांना जोडणारा प्रमुख साकव कोसळला

■ अलिबाग

**तालुक्यातील** थेरोंडा-पालव गावांना जोडणारा प्रमुख साकव अखेर काल गुरुवारी कोसळला. या दुर्घटनेमुळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. विशेष म्हणजे या साकवाची अवस्था धोकादायक असल्याची वारंवार तक्रार प्रशासनाकडे केली होती. मात्र, संबंधित विभागाकडून वेळेवर योग्य उपाययोजना न झाल्याने ही दुर्घटना घडली आहे.

या साकवाचा वापर शालेय विद्यार्थी, वृद्ध, रुग्ण आणि शेतकरी वर्गासाठी अत्यंत महत्त्वाचा होता. याच मार्गावरून दररोज अनेकजण पायी आणि वाहनांनी ये-जा करत होते. पावसामुळे खालचा पाण्याचा प्रवाह वाढल्याने आणि साकवाची स्थिती आधीच कमकुवत झाल्यामुळे अखेर तो कोसळला. हा साकव जीर्ण अवस्थेत असून तत्काळ दुरुस्ती किंवा नवीन साकव बांधण्याची मागणी केली होती. जर वेळेवर दखल घेतली नाही, तर मोठा अपघात किंवा दुर्घटना घडू शकते. परंतु, प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यानेच हा साकव कोसळल्याचा आरोप आता स्थानिकांकडून होत आहे. गावातील नागरिकांनी तत्काळ नव्या साकवाचे काम सुरू करण्याची मागणी केली आहे.

## कोथरूडच्या गोल्डन बेकरीला भीषण आग! ६ जणांची सुटका

■ पुणे

**कोथरूड** परिसरातील सुतार दवाखान्याजवळ असलेल्या बेकरीमध्ये आज पहाटे भीषण आग लागली. बेकरीत अडकलेल्या सहा कामगारांची सुखरूप सुटका करण्यात आली. या आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. आगीमुळे बेकरीत मोठ्या प्रमाणात धूर पसरला होता. पाण्याचा मारा करून जवानांनी अर्ध्या तासात आग आटोक्यात आणली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र बेकरीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

## नोकरीसाठी मुंबईला येताना ट्रेनमध्ये तरुणाचा अपघाती मृत्यू

■ ललितपूर

**नोकरी** करण्यासाठी मुंबईला ट्रेनमधून येत असताना उत्तर प्रदेशातील एका १९ वर्षीय तरुणाचा प्रवासातच मृत्यू झाला. धावत्या ट्रेनमधून गुटखा थुंकताना रेल्वे लाईनच्या खांबाला धडकून खाली पडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना ललितपूर रेल्वे स्थानकाजवळ घडली. मृत तरुणाचे नाव वसीम असे असून तो महाराजगंज परिसरात राहत होता. तो आपला भाऊ आणि काही ग्रामस्थांसोबत मुंबईत कामासाठी अंत्योदय एक्स्प्रेसमधून निघाला होता. मुंबईत जाऊन पैसे कमावून कुटुंबाला आधार देण्याच्या हेतूने त्याने घर सोडले. पण तो मुंबईला पोहोचू शकला नाही. ट्रेन ललितपूर रेल्वे स्थानकाजवळ आली असताना गुटखा थुंकण्यासाठी ट्रेनमधून त्याने डोके बाहेर काढले. त्याचवेळी त्याचे डोके रेल्वे लाईनच्या खांबाला आदळले आणि तो बाहेर फेकला गेला. त्याचा जागीच मृत्यू झाला.

## भारतीय वेषामुळे प्रवेश नाकारला! पोस्ट व्हायरल

■ नवी दिल्ली


**दिल्लीच्या** एका उच्चभ्रू पबमध्ये भारतीय वेष परिधान केलेल्या महिलेला प्रवेश नाकारण्यात आला. यानंतर हा भारतीय संस्कृतीचा अपमान असून, हे हॉटेल ताबडतोब बंद करायला हवे, अशी मागणी तिच्या पतीने एक्सवर व्हिडिओ टाकून केली आहे.

दिल्लीच्या पीतमपुरा या भागात टुबाटा नावाच्या एका पबमध्ये हे दाम्पत्य गेले होते. यातील महिलेने भारतीय वेष परिधान केला होता. त्यामुळे त्यांना प्रवेशद्वारावरच रोखण्यात आले. भारतीय पोशाखात या हॉटेलमध्ये प्रवेश दिला जात नाही, असे त्यांना सांगण्यात आले. त्यावर त्यांनी या घटनेचा व्हिडिओ बनवून तो पोस्ट केला. त्यानंतर दिल्लीचे मंत्री कपिल मिश्रा यांनी मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांना या हॉटेलवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर त्यावर प्रतिक्रियांचा पाऊस पडला. काहींनी दाम्पत्याला समर्थन दिले आहे तर काहींनी म्हटले की, त्यांनी अशा ठिकाणी जावेच का? या व्हिडिओत तक्रार करणारी महिलाच हसत असल्यामुळे तिला खरोखरच राग आला होता की, केवळ प्रसिद्धी किंवा हॉटेलला अडचणीत आणण्यासाठी त्यांनी हा प्रकार केला, अशाही प्रतिक्रिया नोंदवल्या गेल्या आहेत. अशा हॉटेलमध्ये भारतीय वेषात जाऊन तुम्हीच भारतीय संस्कृतीचा अपमान केला असल्याचेही नेटकऱ्यांनी सुनावले आहे.

## पाचगणीजवळील गोडवली गावात दुर्मीळ अल्बिनो पहाडी साप आढळला

■ महाबळेश्वर

**पाचगणी** शहराजवळ असलेल्या गोडवली गावात नुकताच एक दुर्मीळ अल्बिनो पहाडी तस्कर साप आढळला आहे. पाचगणीच्या प्राणी बचाव पथकाच्या तातडीच्या प्रतिसादामुळे हा साप सुरक्षितरित्या पकडण्यात आला असून, वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली त्याचे नैसर्गिक अधिवासात पुनर्वसन केले. गोडवली गावातील एका घरामध्ये सुमारे ३ फूट लांबीचा पांढऱ्या रंगाचा साप दिसून आल्याने नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले. ही माहिती मिळताच प्राणी बचाव पथकाच्या सदस्य संस्कृती बोंगाळे घटनास्थळी दाखल झाल्या. त्यांनी संपूर्ण दक्षतेने सापाला पकडले. हा अल्बिनो पहाडी तस्कर साप रंगद्रव्य अभावामुळे त्वचेला पांढरा व डोळ्यांना लालसर रंग असतो. या अत्यंत दुर्मीळ अवस्थेमुळे ते नैसर्गिक अधिवासात फार काळ जगू शकत नाहीत. कारण इतर सापांना रंगामुळे जे संरक्षण मिळते, ते मिळत नाही.



## शासकीय जमिनीसाठी मांजरे ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा

■ कोल्हापूर

**शाहूवाडी** तालुक्यातील मांजरे गावच्या हद्दीत जनावरांना चरण्यासाठी असलेली शासनाची जागा वनविभागाने ताब्यात घेण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. परंतु ही जागा वनविभागाने जबरदस्तीने ताब्यात घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांच्यावतीने भरत पाटील, सत्यवान पाटील, रामचंद्र पाटील, रामचंद्र पडवळ, बबन वायकूळ या ग्रामस्थांनी दिला आहे.

या ग्रामस्थांनी काढलेल्या पत्रकात म्हटले आहे की, शाहूवाडी तालुक्यातील पश्चिम भागातील डोंगर आणि जंगल यांच्या कुशीत वसलेले मांजरे हे १४०० लोकसंख्या असलेले गाव आहे. या गावात शेती, पशुधन आणि शेतमजुरी हेच एकमेव रोजगाराचे साधन आहे. त्यामुळे गावातील गट नं.४८ मधील जागा वनविभागाने जबरदस्तीने ताब्यात घेण्याचा प्रयत्न केल्यास शेतकऱ्यांना आपली जनावरे चारण्यासाठी ही जागा शिल्लक राहणार नाही.

## मुंबईतील पहिली मुलींची शाळा झाली हाय स्टेट्स नाना शंकरशेट यांनी १८४८ मध्ये केली होती सुरू

■ मुंबई

**ज्या** काळात मुलींना शिक्षणासाठीच नव्हे तर घराबाहेर सुध्दा पडण्याची परवानगी नव्हती त्या काळात जगन्नाथ शंकरशेट यांनी १८४८ मध्ये सुरू केलेली आणि आजही सुरू असलेली मुंबईतील पहिली मुलींची शाळा आता हाय स्टेट्स झाली आहे.

भारतीय रेल्वेचे जनक आणि आधुनिक मुंबईचे शिल्पकार अशी ओळख असलेले जगन्नाथ नाना शंकरशेट यांनी १८४८ मध्ये मुंबईतील गिरगाव येथील चिराबाजार भागात जगन्नाथ शंकरशेट प्राथमिक मराठी शाळा सुरू केली होती. आजही ती



शाळा सुरू आहे. नाना शंकरशेट यांच्या १६० व्या पुण्यतिथीनिमित्त उद्योगपती जयेश बंदरकर यांनी शाळेला हाय स्टेट्स करून विद्यार्थ्यांना अद्ययावत शिक्षण मिळण्यासाठी त्यांच्या आई सुमित्रा बंदरकर यांच्या ७५ व्या जयंतीच्या स्मरणार्थ संगणक भेट दिले.

## महाराष्ट्रातील दीडशेहून अधिक दिग्गज शिवसेनेच्या प्रवेश प्रतीक्षेत! मंत्री उदय सामंत

■ कोल्हापूर

**उपमुख्यमंत्री** एकनाथ शिंदे यांच्या कार्यपद्धतीवर आणि नेतृत्त्वावर विश्वास ठेवून अनेक दिग्गज नेते शिवसेनेत प्रवेश करत असून, राज्यभरातून १५० हून अधिक राजकीय व सामाजिक क्षेत्रातील दिग्गज नेते पक्षप्रवेशाच्या प्रतीक्षेत आहेत, असे शिवसेना नेते मंत्री उदय सामंत यांनी कोल्हापुरात पत्रकार परिषदेत सांगितले.

कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांच्या संघटनात्मक आढावा बैठकीदरम्यान सामंत यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी माजी खासदार संजय मंडलिक, आमदार राजेश क्षीरसागर, आमदार चंद्रदीप नरके - शहाजीबापू पाटील, माजी आमदार डॉ. सुजित मिणचेकर, जिल्हा प्रमुख सुजितभाऊ चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सामंत पुढे म्हणाले, जिल्हा संघटन बैठकीद्वारे सध्या सक्रिय सभासद नोंदणी आणि तालुका-गाव पातळीवरील संघटन रचना सुदृढ करण्यात येत आहे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पक्षांतर्गत निवडणुका घेतल्या जातील आणि त्यानंतर पक्षाध्यक्षांची निवड पूर्ण होईल.

## झारखंडमध्ये आयईडी स्फोट! २ जवान जखमी

■ रांची

**झारखंडमध्ये** चाईबासा जिल्ह्यातील सरंडा जंगलात आज सीआरपीएफ कोब्रा बटालियनचे जवान शोधमोहिमेवर होते. दुपारी १२ वाजताच्या सुमारास जंगलात आयईडी स्फोट झाला. यामध्ये केंद्रीय राखीव पोलीस दलाचे (सीआरपीएफ) दोन जवान जखमी झाल्याची माहिती आहे. त्यांना उपचारासाठी एअरलिफ्ट करून रांची येथील रुग्णालयात दाखल केले. दोघांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली.

## शहापुरच्या माहुली किल्ल्यावर मुंबईचे दोन तरुण भरकटले

■ शहापूर

**माहुली** किल्ल्यावर पर्यटनासाठी गेलेले मुंबईतील दोन तरुण भरकटल्याची घटना येथे घडली. सहा तास चाललेल्या शोधमोहिमेनंतर दोघांना रात्री उशिरा सुखरूपपणे खाली आणण्यात यश आले. रजित झा (१९) आणि अमीर अली (२०) अशी या पर्यटकांची नावे आहेत. त्यांनी गुरुवारी सकाळी ८ वाजता माहुलीगड चढण्यास सुरुवात केली. गड चढत असताना जंगल व झाडीमुळे त्यांना परतण्याची वाटच सापडेनाशी झाली. त्यामुळे ते जंगलात वाट शोधत भटकत राहिले. आपण भरकटलो आहोत हे लक्षात येताच त्यांनी मोबाईलमधील एसओएस सेवा वापरून ११२ क्रमांकावर शहापूर पोलिसांशी संपर्क साधला. पोलिसांनी मिळालेल्या लोकेशनच्या आधारे जीवरक्षक पथकाला सूचना दिली. दुपारी ३ वाजता सुरू झालेली शोधमोहीम तब्बल सहा तास चालली. अखेर रात्री १० वाजण्याच्या सुमारास दोघांनाही शोधून गडाच्या पायथ्याशी सुखरूप आणण्यात आले.

## तुळजापुरात मराठा कार्यकर्त्यांचा मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंना घेराव

■ तुळजापूर

**तुळजापुरात** मराठा कार्यकर्त्यांनी आज महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना घेराव घातला. मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांना मुंबईला जाण्याची वेळ येऊ देऊ नका, असे निवेदन त्यांनी बावनकुळेंना दिले. सरकार मराठ्यांचा अंत पाहत आहे का? असा सवालदेखील यावेळी मराठा कार्यकर्त्यांनी बावनकुळे यांना विचारला. त्यावर बावनकुळे म्हणाले की, सरकार मराठा समाजासोबत उभे आहे. मराठा आरक्षणासाठी सुरुवात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळापासून सुरू झाली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि फडणवीस यांच्यात आरक्षणावर कायम चर्चा होते. मनोज जरांगे-पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनाबद्दल फडणवीस यांच्याशी बोलेन. हे निवेदनदेखील मी त्यांना देईन.

नाशिक महानगरपालिका, नाशिक
घनकचरा व्यवस्थापन विभाग
राजीव गांधी भवन, शरणपूररोड, नाशिक ४२२००२
ई-निविदा सुचना क्रमांक-०५/२०२५-२६
कामाचे नाव:- नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील संपुर्ण नाशिक पूर्व विभाग व नाशिक पूर्व विभागाकडील गंगा/गोदावरी घाट, गौरी पटांगण, अहिल्याबाई होळकर पूल ते कपिला संगम, ना.पुर्व विभागातील महानगरपालिकेच्या सर्व शाळांमधील शौचालये, आस्थापना, विभागीय कार्यालय, मनपाची नाटयगृहे, सभागृहे, जलतरण तलाव, संपुर्ण नाशिक पश्चिम विभाग तसेच, ना.पुर्व आणि ना.पश्चिम विभागाकडील पंचवटी लगतचा व घाटालगतचा भाग, इ.ठिकाणांची साफसफाई व स्वच्छता कामकाज करणेकामी बाहययंत्रणेद्वारे कंत्राटदाराकडून ८७५ कंत्राटी मनुष्यबळ तीन वर्ष कालावधीकरीता उपलब्ध करून घेणे बाबत..
इच्छुक निविदाधारकांनी सविस्तर माहितीसाठी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भेट दयावी.
जनसंपर्क/जा.क्र/२०५/२०२५
दि.०७/०८/२०२५
सही/-
आयुक्त तथा प्रशासक,
नाशिक महानगरपालिका, नाशिक
झाडे लावा, झाडे जगवा

# आजच्या काळासाठी कालचं नाटक: संगीत संन्यस्त खड्ग

नाट्यजगत
मकरंद जोशी

मराठी रंगभूमीचे वैभव वाढवणारे जे अनेक नाटककार होऊन गेले, त्यात आपल्या मोजक्या पण महत्वपूर्ण नाटकांची मोलाची भर घालणारे नाटककार म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर. वृत्तीने कवी असलेले सावरकर काही अन्य नाटककारांप्रमाणे लोकांचे चार घटका मनोरंजन करावे म्हणून नाट्यलेखनाकडे वळलेले नाहीत. त्यांनी अवघी तीनच नाटके लिहिली, ती सुध्दा १९२७ ते १९३३ या काळात, जेव्हा ते रत्नागिरीला स्थानबद्ध होते. नाट्यलेखन करताना त्यांच्या समोर जो एकच उद्देश होता, तो अर्थातच त्यांच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक विचारांशी सुसंगत असाच होता. त्यामुळेच स्वातंत्र्यवीरांनी लिहिलेल्या नाटकांमधील 'संन्यस्त खड्ग' सुमारे ९४ वर्षांनी पुन्हा रंगमंचावर आले म्हटल्यावर एक प्रकारची उत्सुकता आणि कुतुहल मनात असणं स्वाभाविकच होतं. 'संगीत संन्यस्त खडग' बघताना पुन्हा एकदा सावरकरांचे विचार काळाच्या पुढे होते याची खात्री नक्कीच पटते.

अहिंसा आणि करुणा या तत्वांवर चालणाऱ्यांना खऱ्या अर्थाने 'धम्म' सापडला आहे, असा संदेश देणाऱ्या तथागत गौतम बुद्ध यांच्या काळातील घटनाक्रमावर 'सन्यस्त खड्ग' नाटक आधारीत आहे. माणसाच्या आयुष्याचा नेमका उद्देश काय आणि त्याच्या दुःखाचे मूळ कशात आहे, याचा शोध घेण्यासाठी राजमहल आणि सुखासीन जीवन त्यागून गेलेल्या राजपुत्र सिद्धार्थ गौतमाला जी ज्ञानप्राप्ती झाली, त्यानंतर त्याने आपला पंथ निर्माण केला. अहिंसेचा मंत्र जपणारा बुद्ध आपल्या जन्मभूमीत कपिलावस्तु नगरीत अनेक वर्षांनी परत येतो. तेव्हा त्याच्या वडिलांना राजा शुद्धोदनाला वाटते की तो पुन्हा सिंहासनाचा स्वीकार करेल. मात्र ऐहिक, प्रापंचिक जगापासून लांब गेलेला बुद्ध तसं करत नाही. उलट, आपल्या उपदेशाने कपिलावस्तुचा - शाक्यांचा पराक्रमी सेनापती विक्रमसिंह यालाच शस्त्र संन्यास घेऊन, भिक्षु व्हायला भाग पाडतो.

काही वर्षांनी जेव्हा विक्रमसिंहाचा शूर मुलगा वल्लभ शाक्यांचा सेनापती झालेला असतो, तेव्हा शेजारच्या कोसल देशाचा कपटी राजा शाक्यांवर आक्रमण करतो. अशा प्रसंगी विक्रमसिंहासारखा अनुभवी, पराक्रमी वीर रणांगणात हवा म्हणून शुद्धोदन याला संन्यास सोडून येण्याची विनंती करतो. मात्र गौतम बुद्धांना त्यांच्या तत्वज्ञानानुसार युद्ध नको असते. शिवाय, एकदा संघाची तत्वे स्वीकारल्यानंतर विक्रमसिंहाने परत खड्ग हातात घेऊन नरसंहार करणे चुकिचे वाटत असते. मग विक्रमसिंह आपल्या संन्यस्त खड्गाला जागृत करतो का? हिंसा आणि अहिंसा यात श्रेष्ठ कोण ठरतं? संन्यासी वृत्तीत जगाचं कल्याण आहे का संसारी वृत्तीत? या प्रश्नांची उत्तरे प्रत्यक्ष रंगमंचावरच पाहायला हवीत.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी हे नाटक लिहिलं तेव्हा देशातील राजकारणात आणि स्वातंत्र्यचळवळीत अहिंसा, दया, करुणा या तत्वांचा उदो उदो सुरू झालेला होता. लहानवयातच स्वातंत्र्यासाठी शत्रूला 'मारिता मारिता मरेतो झुंजेन' अशी शपथ घेणाऱ्या सावरकरांना अहिंसेचं स्तोम पटणं शक्यच नव्हतं. मात्र त्याचबरोबर त्यांना बुद्धाच्या तत्वज्ञानाचं, त्याने सांगितलेल्या नव्या पद्धतीच्या धर्माचं महत्त्वही कळलेलं होतं.

त्यामुळे हे नाटक लिहिताना त्यांनी अहिंसा विरुद्ध हिंसा इतक्या सरधोपटपणे विषय मांडलेला नाही. पहिल्या अंकातील बुद्ध आणि विक्रमसिंह यांच्यातील दीर्घ संवाद म्हणजे सावरकरांच्या वकिली बुद्धीचा आणि तर्ककठोर विचारसरणीचा परिपाकच आहे. त्या काळातील नाट्यतंत्रानुसार गंभीर, विचारमंथन करणाऱ्या कथानकाचा ताण हलका व्हावा म्हणून सावरकरांनी शाकंभट आणि त्याची पत्नी क्षारा यांचे प्रवेश योजलेले आहेत; मात्र इथेही निव्वळ विनोदासाठी विनोद न करता, सावरकरांनी हिंदू आणि बौद्ध धर्मातील चुकीचे पायंडे, गैरसमजुती, अंधश्रद्धा यावर प्रहार केले आहेत.



कालचं असूनही हे नाटक त्यातील विचारांमुळे जसं आजचं वाटतं, त्याचबरोबर आजच्या प्रेक्षकांचा विचार करून या नाटकाचा नेटका आणि सुविहित प्रयोग सादर करण्याचं मुख्य श्रेय दिग्दर्शक हृषिकेश जोशी यांच्या परिपूर्ण संकलनाला जातं.

मुळातल्या तीन अंकी नाटकाची अतिशय सुयोग्य अशी दोन अंकी रंगावृत्ती तयार करून त्यांनी सावरकरांच्या विचारांना योग्य न्याय दिला आहे. त्या काळानुसार संगीत नाटक असल्याने बुद्धापासून ते वल्लभापर्यंत विविध व्यक्तिरेखांना असलेल्या गीतांच्या संख्येवर कठोर नियंत्रण ठेवल्याने आजच्या काळातील प्रेक्षकांना नाटकाचा आस्वाद घेणे सोपे झाले आहे. दिग्दर्शक म्हणून जोशी यांनी नाटकातील संघर्षाचे क्षण जसे टोकदार केले आहेत, तसेच हलकेफुलके विनोदी क्षण छान खुलवले आहेत. वल्लभ आणि सुलोचनामधील प्रेमाचे नाजूक क्षणही त्यांनी चांगले बांधले आहेत.



भगवान गौतम बुद्धाच्या भूमिकेत ओमकार कुलकर्णी अतिशय शोभून दिसले आहेत. बुद्धाच्या चेहऱ्यावरचा प्रसन्न, आश्वासक आणि शांत करणारा स्मित, बुद्धाच्या बोलण्यातला ठामपणा. करुणा हे भाव त्यांनी उत्तम प्रकारे दाखवले. सेनापती विक्रमसिंहाची भूमिका साकारताना ऋत्विज कुलकर्णी यांनी या व्यक्तिरेखेला पडणारा पेच आणि त्यातून होणारी मनाची दोलायमान स्थिती योग्य प्रकारे व्यक्त केली. ओमप्रकाश शिंदे यांनी वल्लभाच्या भूमिकेत सुलोचनेबरोबरचा नर्मशृंगार आणि युद्धावर जाताना वीर रस दोन्ही यथायोग्य दाखवले. दिग्दर्शक ऋषिकेश जोशी यांनी शाकंभटाच्या विनोदी व्यक्तिरेखेत हमखास हशे वसूल करून, अशा प्रकारच्या भूमिकांवरची आपली हुकुमत सिद्ध केली. त्यांना क्षाराच्या भूमिकेत मयुरा रानडे यांनी तितकीच तोलामोलाची साथ दिली.

संगीत संन्यस्त खड्ग मधील नाट्य संगीताची सगळी जबाबदारी केतकी चैतन्य यांनी अतिशय सुरेलपणे पेलली आहे. 'मर्मबंधातली ठेवही' आणि 'शत जन्म शोधितांना' ही लोकप्रिय नाट्यगीते त्यांनी अतिशय तयारीने सादर केली. गाण्याबरोबरच त्यांनी अभिनयातही कमी नाही हे आधीच्या रोमँटिक आणि नंतरच्या वीर रसाच्या प्रवेशात दाखवून दिले. इतर छोट्या छोट्या भूमिकांमध्ये सर्वच कलाकारांनी सुयोग्य साथ दिली. मुख्य म्हणजे सावरकरांची भरजरी भाषा, उपमा-उत्प्रेक्षांची वाक्ये सगळ्या कलाकारांनी लिलया पेलली आणि नाटकाचा परिणाम द्विगुणित केला.

**नाटक :** संगीत संन्यस्त खड्ग
**निर्मिती :** सावरकर दर्शन प्रतिष्ठान व नाट्यसंपदा कला मंच
**दिग्दर्शन :** ऋषिकेश जोशी
**कलाकार:** ओमकार कुलकर्णी , मयुरा रानडे , ऋत्विज कुलकर्णी , ओमप्रकाश शिंदे आदि

# दोन जॉली नाकात दम आणणार सुंदरलाल त्रिपाठीच्या



खिलाडी कुमार उर्फ अक्षय कुमार आणि अभिनेता अरशद वारसी यांनी मार्च २०२५ मध्ये एक मजेशीर व्हिडिओ बनवून 'जॉली एलएलबी' च्या तिसऱ्या भागाची घोषणा केली होती. या सिनेमामध्ये हे दोन्ही कलाकार पुन्हा एकदा काळा कोट घालून कोर्टात केस लढताना दिसणार आहेत. नुकतेच 'जॉली एलएलबी ३' मधील जज सुंदरलाल त्रिपाठी ही व्यक्तिरेखा साकार करणारे अभिनेता सौरभ शुक्ला यांचा एक धमाल व्हिडिओ समोर आला आहे. या व्हिडिओमध्ये त्यांनी चित्रपटाच्या टीझरच्या प्रदर्शनाची तारीखही घोषित केली आहे. या व्हिडिओमध्ये सौरभ शुक्ला म्हणतात, 'डॅशिंग तर मी नेहमीच राहिलो आहे... डॅशिंग आणि फिट. लाइफ वॉज ए बेड ऑफ रोझेस. मग आला जगदीश त्यागी (जॉली-१), प्रत्येक गोष्टीवर संतप्त होत असे आणि त्याला इंग्रजी अजिबात येत नव्हती. ज्या माणसाला प्रॉसिक्यूशन आणि प्रॉस्टिट्यूशन या शब्दातील फरक कळत नाही, त्याला काय बोलायचे? नाव त्याचे त्यागी होते, पण स्वस्थपणा आणि झोप याचा मला त्याग करावा लागला. सौरभ शुक्ला पुढे म्हणतात, मी मरण्याच्या अवस्थेत होतो, तेवढ्यात आला जगदीश्वर मिश्रा (जॉली-२), खूप वाईट माणूस होता. प्रामाणिकपणा सोडा, किडणी विकण्याच्या गोष्टी करणारा. त्याच्यामुळे माझ्या पत्नीला हार्ट अटॅक आला. यावेळी माझे नशीब माझ्यासह जो खेळ खेळत आहे, तो मी सहन करणार नाही. कारण हे दोन्ही जॉली माझ्या आयुष्यात 'जॉली-जॉली यस पापा' करण्यासाठी पुन्हा येत आहेत. ही कुठली माणुसकी? मी मानतो की, कोर्टात संतुलन ठेवणे गरजेचे आहे, पण माझ्या संतुलनाचे काय? मी वेडा झालो आहे. १२ ऑगस्ट रोजी 'जॉली एलएलबी ३' चा टीझर प्रदर्शित होणार असल्याचे देखील त्यांनी या व्हिडिओमध्ये सांगितले आहे. या चित्रपटामध्ये सौरभ शुक्ला, अक्षय कुमार, अरशद वारसी यांच्यासह हुमा कुरेशी सुध्दा पुष्पा पांडे बनून परतत आहे. हा सिनेमा १९ सप्टेंबर रोजी प्रदर्शित होत आहे.




# बिग बॉस १९ मध्ये पूरव, शैलेश, गुरुचरण आणि बरेच...

बिग बॉस चा १९वा सीझन २४ ऑगस्टला सुरू होत आहे. या सीझनमध्ये सहभागी होणार्या अनेक सेलिब्रिटींची नावे समोर आली असली तरी अधिकृतपणे कुणीही हामी भरली नव्हती. परंतु आता काही स्पर्धकांची नावे अधिकृतपणे समोर आली आहेत. त्यातील एक नाव आहे यूट्यूबर पूरव झा याचे. ॲमेझॉन प्राइम व्हिडिओवरील रिॲलिटी शो 'द ट्रेटर्स' मध्ये त्याने भाग घेतला होता. या शोचा तो विजेता बनू शकला नाही, परंतु 'द ट्रेटर्स' मुळे पूरवला बिग बॉस १९ मध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. त्याचप्रमाणे, तारक मेहता का उल्टा चष्मा या लोकप्रिय मालिकेमध्ये तारक मेहताची भूमिका करून लोकप्रियता मिळवणारे अभिनेता शैलेश लोढा, तसेच याच मालिकेतील अन्य अभिनेता गुरुचरण सिंग हे देखील बिग बॉस १९ मध्ये दिसणार आहेत. सोबतच पायल धरे उर्फ पायल गेमिंग, मिस्टर फैजू, श्रीराम चंद्र, धनश्री वर्मा, गौरव खन्ना, अपूर्वा मुखीजा, हुनर गांधी, अमाल मलिक हे सेलिब्रिटीजही बिग बॉस १९ चे स्पर्धक असणार आहेत. स्पर्धकांची ही यादी समोर आल्यावर या शोच्या चाहत्यांचा उत्साह वाढला आहे. त्यांच्या उलट सुलट कॉमेंट्स सोशल मीडियावर वाचायला मिळत आहेत. एका युजरने ट्वीट केले आहे की, 'सुरू झाले, एका चांगल्या शोमध्ये इन्फ्लुएन्सर्सचा भडीमार,' तर दुसऱ्या युजरने लिहिले आहे की, 'ही चांगली बातमी आहे की, अपूर्वा सुद्धा या शोमध्ये सहभागी होत आहे. टीआरपी भरपूर मिळणार शोला.'

# शेखरनी का नव्हते घेतले मानधन?



माधुरी दीक्षितच्या सौंदर्याचे आणि अभिनयाचे चाहते केवळ सर्वसामान्य प्रेक्षकच नाहीत, तर अनेक चित्रपट कलाकार देखील आहेत. एक असा अभिनेता आहे, ज्याने माधुरीसह काम करायची संधी मिळाल्यावर आपल्या कामाचा मोबदला देखील घेतला नव्हता. कोण होता तो अभिनेता? अभिनेता आणि टीव्ही शोचा लोकप्रिय सूत्रसंचालक शेखर सुमनला कुठल्याही परिचयाची आवश्यकता नाही. गेली अनेक वर्षे चित्रपट आणि टीव्ही माध्यमामध्ये ते सातत्याने काम करत आहेत. काही काळापूर्वीच दिग्दर्शक संजय लीला भंसाळीच्या 'हिरामंडी' या वेबसीरिजमध्ये शेखर सुमन दिसले होते. ही गोष्ट १९८४ सालची आहे. यावर्षी प्रदर्शित झालेल्या 'अबोध' या चित्रपटाद्वारे माधुरीने हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये पदार्पण केले होते. आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळामध्ये शेखर सुमनची नायिका म्हणून तिने काम केले होते. १९८६ साली प्रदर्शित झालेल्या त्या चित्रपटाचे नाव होते 'मानव हत्या'. परंतु या सिनेमामध्ये काम करण्यास आधी ती तयार नव्हती. 'मानव हत्या'चे दिग्दर्शक सुदर्शन के रतन यांनी एक दिवस शेखर सुमनला फोन केला आणि चित्रपटात काम करण्यासाठी विचारले व सोबत हे देखील सांगितले की, चित्रपटात काम करण्यासाठी मी तुला पैसे देऊ शकणार नाही. सुदर्शननी शेखर सुमनला सांगितले की, एक नवी अभिनेत्री आहे आणि तिने राजश्री प्रॉडक्शनच्या 'अबोध'मध्ये काम केले आहे. हे कल्यावर शेखर सुमन खट्टू झाला. त्याने सुदर्शनना सांगितले की, तुम्ही मला पैसे देणार नाही आणि हिरॉईनसुद्धा नवी आहे, मग मी कशाला तुमच्या चित्रपटात काम करु? परंतु नंतर शेखर सुमन यांनी माधुरी दीक्षितला पाहिले तेव्हा लगेच चित्रपटात काम करण्यास होकार दिला व सुदर्शनना सांगितले की, मी तुमच्या चित्रपटामध्ये काम करण्याचा मोबदला नको माधुरी तेव्हा अगदीच नवी हिरोईन होती. शेखर सुमन तिच्यावर इतके फिदा झाले होते की, रोज शूटिंगच्या निमित्ताने आपली बाईक घेऊन ते माधुरीच्या घरी जाऊन तिला पिक करत आणि शूटिंग संपल्यावर घरी सोडत असत.



# सलमानने मला मिठी मारायला नकार दिला...

**सलमान खान आणि ऐश्वर्या राय यांच्या प्रेमाची सुरुवात 'हम दिल दे चुके सनम' या सिनेमाद्वारे झाली होती. दोघेही पहिल्यांदाच एकमेकांसमवेत या सिनेमामध्ये दिसले होते आणि चित्रपट बनता बनता दोघेही एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडाले होते. या चित्रपटामध्ये अभिनेत्री शीबा चड्ढाने ऐश्वर्याच्या चुलत बहिणीची भूमिका साकारली होती. तिने एका मुलाखतीमध्ये सलमान खान व ऐश्वर्या रायसह काम करतानाचे अनुभव शेअर केले आहेत. शीबा चड्ढाने सांगितले की, चित्रपटातील एका सीनमध्ये सलमान खान मला जवळ घेतो असे दाखवायचे होते. परंतु सलमानने तसे करण्यास नकार दिला. सिनेमामध्ये एक सीन होता की, मी प्रियकरासह घरातून पळून जात असते तेव्हा ऐश्वर्याला मिठी मारते आणि नंतर सलमानला. परंतु सलमानने सांगितले की, मी मिठी मारणार नाही. त्यामुळे बराच वेळ शूटिंग थांबले होते. दिग्दर्शक संजय लीला भंसाळींनी सलमानला बाजूला नेऊन समजावण्याचा प्रयत्न केला. त्याच्या या वागण्यामुळे मला फार वाईट वाटले. मला कळलेच नाही की त्याने का नकार दिला त्या सीनसाठी. इतकेच नाही, तर एक दिवस रागावलेला सलमान घाईने बाहेर गेला आणि त्याने दरवाजा इतका जोरात बंद केला की, तिथे बसलेल्या एका वृद्ध लाइटमॅनला जखम झाली. त्यावेळी माझ्या मनात प्रश्न आला की, स्टार कलाकार असे वागत असतात का?**


# संजयने मला चित्रपटसृष्टी सोडायला सांगितले...





आपल्या चार वर्षांच्या लहानशा कारकिर्दीमध्ये अभिनेत्री दिव्या भारतीने चाहत्यांच्या मनामध्ये जे स्थान निर्माण केले होते, अन्य अनेक अभिनेत्री कदाचित आपल्या लांबलचक कारकिर्दीमध्ये देखील ते मिळवू शकलेल्या नाहीत. १९९० साली तमिळ चित्रपट 'नीला पेन्ना'द्वारे दिव्याने अभिनयाची सुरुवात केली होती आणि नंतर फौलाद, दिवाना, दिल आशना है, विश्वात्मा, दिल का क्या कसूर, शोला और शबनम, बलवान अशा अनेक हिंदी सिनेमामध्ये तिने काम केले होते. १९९३ मध्ये तिचे अपघाती निधन झाले. बहीणीच्या पाऊलावर पाऊल टाकत दिव्या भारतीच्या दूरच्या एका बहीणीने 'खट्टा-मीठा' या सिनेमाद्वारे चित्रपटात पदार्पण केले होते, पण तिला सफलता मिळू शकली नाही. नुकतेच दिव्याच्या या चुलत बहिणीने आपली अभिनय कारकिर्द अयशस्वी होण्याचे आणि संजय दत्तसारख्या स्टार कलाकाराने तिला चित्रपट सोडायला सांगण्याचा सल्ला दिला होता याविषयी एका मुलाखतीमध्ये सांगितले आहे. कोण आहे दिव्याची चुलत बहीण? २०११ मध्ये अक्षय कुमारसह काम करणाऱ्या या अभिनेत्रीचे नाव कायनात अरोरा आहे. तिने हिंदी सिनेसृष्टीद्वारे आपल्या अभिनयाची सुरुवात केली खरी, परंतु यश न मिळाल्यामुळे नंतर तिने पंजाबी आणि दाक्षिणात्य सिनेमांमध्ये काम केले. अर्थात कायनातला तिथे देखील यश मिळाले नाही. 'दिव्या माझी चुलत बहीण नसती तर कदाचित माझी कारकिर्द यशस्वी झाली असती. मी आजही दिव्याची मोठी चाहती आहे,' आपल्या संघर्षाविषयी बोलताना कायनातने सांगितले की, संजय दत्त आणि दाक्षिणात्य सुपरस्टार अजीत कुमार या दोघांनी मला चित्रपटसृष्टी सोडायचा सल्ला दिला होता. अजीतसह, मी 'मनकथा' या चित्रपटात काम केले होते. त्याने मला सांगितले की, कायनात, तू खूप साधी मुलगी आहेस. या क्षेत्रात काम करण्यासाठी तुला पूर्णपणे तयार व्हावे लागेल, कारण हा प्रवास सहज नाही. संजय दत्तने देखील आपल्याला हाच सल्ला दिला होता, असे कायनातने सांगितले. 'खट्टा मीठा' सह, तिने ग्रँड मस्ती आणि खूबसूरत या चित्रपटांमध्ये काम केले आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१३३७



**आडवे शब्द –** १. सावधगिरी ४. टीकाकार, समीक्षक ७. रात्र, रजनी ९. सपशेल, धडधडीत (खोटे) ११. तलवार, समशेर १२. उद्यान १३. संकोची स्वभावाचा १५. भूछत्र, अळिंबी १६. सौंदर्य १७. बोटांच्या पुढचा कडक भाग १९. वशिष्ठ ऋषींची गाय २०. दयाळू २२. देवापुढे जाळले जाणारे सुगंधी द्रव्य २५. ग्रोसचा बारावा भाग २८. वेटरला दिलेले बक्षीस २९. हिमालयातील पवित्र गुंफा, येथे आठ-दहा फूट उंचीचे बर्फाचे शिवलिंग आपोआप तयार होते ३१. स्वीकार ३४. अंगणाचे दार ३६. सुंदर युवती ३८. बाण, तीर ३९. किरकोळ, नगण्य ४१. शिकार ४२. वाईट चालीची ४४. पैसा, संपत्ती ४५. एकूण रचना, निर्मिती ४९. काळ्या रंगाची छटा, कलंक ५०. भला, सज्जन ५२. रुची, स्वारस्य ५३. फ्रॉक ५४. मुलायम, मृदू ५५. कूर्म, कच्छप ५७. ताकीद, तंबी ५९. अनृत, असत्य ६०. एक पाश्चात्य तंतुवाद्य ६१. बकरा, बोकड ६३. लेंगा ६५. भांडण, झगडा ६७. वालुकामय प्रदेश ६९. माणुसकी ७१. गौरीच्या नैवेद्यासाठी कोकणात केले जाणारे दोन मुख्य पदार्थ ७४. अपस्माराचा झटका ७७. गर्दी ७८. भिंतीवर सरपटणारा किळसवाणा प्राणी ७९. प्रतिष्ठा ८०. पडते घेणे ८१. आयुध, साधन ८३. ठिय्या आंदोलन ८४. नर मांजर ८५. भिकबाळी ८७. युद्ध ८८. चैत्र महिन्याचा आरंभ ८९. कानासमोरचा गालाचा भाग ९१. मूर्खासारखा वागणारा, वाह्यात ९३. धनुष्य ९४. नूतन ९५. शिष्य ९६. तेजोहीन ९८. ज्ञात, ठाऊक ९९. शेतात खुरपणीचे साधन १००. मात १०१. जाडसर दळलेले गहू १०२. उफराटे, विरुद्ध १०३. बभ्रा १०४. हुद्दा १०६. दिवा ठेवण्याची तिवई १०७. मृत १०८. मानसिक ताण

**उभे शब्द –** १. धान्य दळण्याचे दगडी अवजार २. आकाश ३. ध्वनिवर्धक, भोंगा ४. नशीब ५. मिश्रण, खिचडी ६. परीट ८. मेषपात्र, मुखदुर्बळ ९. धांदल, घाई १०. झाड, वृक्ष १२. डोकेदुखीवरचे मलम १४. वन्य, जंगली १८. पाषाण १९. श्रवणेंद्रिय २१. उपयोग करणे २३. भरपूर, खूप २४. वाईट पायगुणाचा २६. शाईची लेखणी २७. जुन्या भाषेत मोटरसायकल २९. टोक, अग्र ३०. काठ, किनारा ३२. बेडूक, मंडूक ३३. गाठोडे ३४. जास्त, पुष्कळ ३५. गुप्त बेत, कारस्थान ३७. शिकारीच्या वेळी टेहळणीसाठी झाडावर उंच बांधलेली तात्पुरती बैठक ४०. फुलातील पराग ४१. हरणाचे पिल्लू ४३. फेकून देण्याजोगे ४४. मोठा आवाज, स्फोट ४६. अर्धचंद्र, हकालपट्टी ४७. पक्ष्यांचे निवासस्थान ४८. निखारा ५०. अंगवळणी पडलेली गोष्ट ५१. अवस्था ५३. हाणामारी ५४. मला (कवितेतला शब्द) ५६. समतल पृष्ठभाग ५७. निष्ठावंत ५८. नियमित वावर ५९. अडथळा आणणे ६१. अफू ६२. गोंधळ, घोटाळा ६४. आय ६६. दुर्लक्ष, नजरचूक ६७. अतिशय जास्त ६८. वंदनीय ७०. आयुर्वेदिक औषधाची गोळी ७२. डोंगरातला रस्ता ७३. लेखन करणारी ७५. उपरा, बाहेरचा ७६. लोभी ७८. कबूतर ८२. भान, समज ८३. आशादायक स्थिती ८४. कातडीबचाऊपणा ८६. अधम ८८. निपुण ८९. दुष्ट हेतू ९०. दरारा ९१. अलंकार ९२. तडाखा ९३. कापसाची मऊ जात, शाल्मली ९४. नुकताच जन्मलेला ९७. युद्धबंदी ९८. थिटा ९९. बुटका १०३. धेनू १०५. दहिवर •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३३६चे उत्तर**

**आडवे शब्द :** २. सुरा ४. धाक ६. जिवलग ८. सराफकट्टा ११. स्तुतिपाठक १४. ललना १६. संगम १७. भरणी १८. ठोकताळा २०. जगावेगळा २२. बटीक २४. वरद २५. माल २६. सम २७. सट्टा २८. सटवाई ३०. रघुपती ३२.कण ३३. गर्व ३४. राजी ३५. गदा ३६. आड ३७. साज ३८. चैन ३९. खासदार ४२. नगरसेवक ४५. रबर ४६. भग ४८. दगा ४९. सावज ५०. हरीण ५१. आयतन ५४. मकरंद ५७. खूण ५८. सून ५९. चांगदेव ६१. धाडस ६४. मंद ६५. जाच ६६. ऐदी ६७. वसती ६८. पेव ६९. मदत ७२. मकबरा ७३. मदार ७४. कपोत ७५. तीर ७६. सखी ७७. दाता ७८. वसा ८१. सदा ८२. जमा ८३. गुंतवणे ८४. नाजूक ८६. अमरत्व ८८. रंक ८९. खादाड ९१. खोक ९२. थाप ९४. रिषभ ९६. नाल ९८. लुडबूड १००. लाह्या १०१. तडा १०३. चित्ताकर्षक १०४. लवलेश १०५. नस १०७. नवती १०८. धुनी १०९. डाळ ११०. अवगाहन

**उभे शब्द :** १. कौस्तुभ २. सुपाणी ३. राठ ५. कलता ६. जिना ७. लफंगा ८. सगळा ९. राम १०. कसोटी १२. तिरसट १३. कठोर १५. लळा १६. संगम १९. कदरदान २०. जल २१. वेसण २२. बट्टा २३. कलौंजी २४. वई २५. माती २७. सर्व २८. सलोखा २९. वायदा ३१. पसार ३२. कडक ३३. गजबज ३४. रानभरी ३६. आव ३७. सारवान ४०.समयसूचकता ४१. रदन ४३. गच्ची ४४. सेवक ४७. गणना ५०. हणमंत ५२. तन ४३. ढोंग ५४. मवसर ५५. रंधा ५६. दडपेपोहे ५९. चांदी ६०. देवदार ६२. सवत ६३. गमतीदार ६५. जामदारखाना ६६. ऐरावत ७०. दर ७१. शेखी ७६. समारंभ ७९. सावळा ८१. समज ८३. गुंड ८४. नाकबूल ८५. कथा ८७. त्वरित ९०. दालचिनी ९१. खोड ९३. पलाश ९५. षडानन ९७. उकळी ९८. लुकडा ९९. डवरा १०२. अतीव १०५. नव १०६. सगा

# शपथपत्रावर सहीनिशी आरोप करा आयोगाचे राहुल गांधींना आव्हान

पान १ वरून

त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, जर राहुल गांधी यांना वाटत असेल की ते जे काही आरोप करत आहेत ते खरे आहेत तर त्यांना शपथपत्रावर तसे लिहून त्यावर स्वाक्षरी करण्यास काहीच हरकत नसावी. राहुल गांधी तसे करणार नसतील तर त्यांना त्यांच्या शब्दांवर विश्वास नाही किंवा ते जाणूनबुजून खोटे आरोप करतात हे सिद्ध होईल. अशा परिस्थितीत खोटे आरोप करून निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थेवरील लोकांचा विश्वास डळमळीत करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्यांनी देशाची माफी मागावी.

निवडणूक आयोगाच्या आव्हानाला राहुल गांधी यांनी पुन्हा प्रश्न विचारत कोंडीत पकडण्याचा प्रय़त्न केला. आमच्या मागणीनुसार आम्हाला मतदार याद्या डिजिटल स्वरुपात उपलब्ध करून का देत नाही, मतदानाची आकडेवारी आणि मतदान केंद्रातील सीसीटीव्ही फुटेज ४५ दिवसांत नष्ट करण्याचा आग्रह कशासाठी धरता, मतदार याद्यांमध्ये या घाऊक चुका कोणाच्या सांगण्यावरून करता , प्रश्न विचारणाऱ्यांना का धमकावता , भाजपाचे दलाल म्हणून का वावरता आणि आम्ही प्रश्न उपस्थित करताच अधिकृत वेबसाईट बंद का केली, असे प्रश्न राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाला उद्देशून विचारले. त्याचबरोबर मी विरोधी पक्ष नेता आहे. संसदेत शपथ घेतली आहे. जे काही बोललो ते जबाबदारीने बोललो आहे. आणखी शपथपत्र कसले मागता, असा सवालही राहुल गांधी यांनी केला.

## मुंबईत काँग्रेसचे ठिय्या आंदोलन

राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर केलेल्या आरोपांच्या समर्थनार्थ आज दादर येथील टिळक भवनसमोर काँग्रेसने ठिय्या आंदोलन केले. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह काँग्रेस प्रमुख पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. या आंदोलनाबाबत काँग्रेसने कमालीची गुप्तता पाळली होती. त्यामुळे या परिसरात पोलीस बंदोबस्त फारसा तैनात करण्यात आला नव्हता. अचानक काँग्रेसचे कार्यकर्ते टिळक रोड समोरील फुल मार्केटच्या रस्त्यावर ठाण मांडून बसले. त्यामुळे परिसरात वाहतूक कोंडी झाली. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. काँग्रेस कार्यकर्त्यांनी निवडणूक आयोगाच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी करीत परिसर दणाणून सोडला. निवडणूक आयोगाच्या कार्यपध्दतीमुळे लोकशाही धोक्यात आली आहे. मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता पूर्णपणे नष्ट झाली आहे. लोकशाही वाचवण्यासाठी आमचे हे आंदोलन आहे. मतदान प्रक्रिया पारदर्शक असलीच पाहिजे. इव्हीएम यंत्रांऐवजी मतदान पत्रिकांवर घ्यावे , ही आमची मागणी आहे, असे सपकाळ यांनी सांगितले.

# देवतांवरील पोस्ट गांभीर्याने घ्या! मद्रास हायकोर्टाचे आदेश

■ चेन्नई

हिंदू देवदेवतांवरील समाजमाध्यमांवरील पोस्ट गंभीरपणे घेण्याचे आदेश



मद्रास उच्च न्यायालयाने दिले आहेत. एका व्यक्तीच्या श्रीकृष्णजन्माष्टमीच्या पोस्टवरील कमेंटमध्ये श्रीकृष्णाचा अपमान करण्यात आला होता. हे प्रकरण बंद करण्याची पोलिसांची विनंती हायकोर्टाने फेटाळून लावत या प्रकरणाचा पुन्हा तपास करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हायकोर्टाने तामिळनाडू पोलिसांवर कठोर ताशेरे ओढले आहेत.

न्यायमूर्ती के मुरली शंकर यांनी सुनावणी दरम्यान म्हटले की, देवदेवतांच्या विरोधातील पोस्टकडे गंभीरपणे पाहिले पाहिजे. कारण त्यामुळे अनेकांच्या भावना दुखावल्या जाऊ शकतात. अशा पोस्टमुळे पुढे सामाजिक तेढही निर्माण होते. अभिव्यक्तीस्वातंत्र्य म्हणजे काहीही बोलण्याचे स्वातंत्र्य नाही. पोलिसांनी या प्रकरणाची पुन्हा नव्याने चौकशी करावी.

**जाहीर सूचना**

आमच्या अशिलांच्या सूचनेनुसार आणि त्यांच्या वतीने, सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे की, २० ऑक्टोबर १९८९ रोजी दिवंगत **उदय डी. नायक आणि श्रीमती उशा उदय नायक (निष्पादक)** यांनी **श्री. राजीव दामोदर नायक *(राजीव)*** यांच्या नावे अंमलात आणलेला जनरल पॉवर ऑफ अॅटर्नी, कार्यकारीणीने ५ एप्रिल २०१४ रोजीच्या त्यांच्या पत्रांद्वारे आणि १५ मे २०१४ रोजी बिझनेस स्टँडर्ड आणि नवशक्तीमध्ये प्रकाशित केलेल्या जाहीर सूचनेद्वारे औपचारिक आणि स्पष्टपणे रद्द केला आणि त्याअंतर्गत प्रदान केलेले सर्व अधिकार, शक्ती आणि हक्क समाप्त केले आहे. परिणामी, राजीवची जागा घेणारा कोणताही पॉवर ऑफ अॅटर्नी, किंवा त्याअंतर्गत मिळवलेला कोणताही अधिकार, ज्यामध्ये कार्यकारी अधिकाऱ्यांच्या वतीने काम करण्याचा दावा करून राजीवने अंमलात आणलेले कोणतेही उप- प्रतिनिधी किंवा कागदपत्रे समाविष्ट आहेत, ते देखील अस्तित्वात नाहीत आणि ते रद्दबातल झाले.

सदर पॉवर ऑफ अॅटर्नी खालील मालमत्ता आणि व्यवसायांशी संबंधित होती, परंतु त्यापुरते मर्यादित नव्हती ज्यामध्ये निष्पादकांना मालक किंवा भागीदार म्हणून अधिकार होते:

**मालमत्ता आणि फर्म्सचे वर्णन:**

१. सर्व्हे क्र. ३१६ / ३ए, ३१६/१, ३१६ / २, ३१६/४, ३१७/६, ३१७/७, ३१७/९, ३१७/१०, ३१७/११, ३१७ / १२, ३१३ / २ / ८, विरार गाव, तालुका वसई, जिल्हा पालघर, दामोदर नगर, विवा कॉलेज रोड, विरार पश्चिम येथे स्थित.
२. सर्वे क्र. १२२/१/१, १२२/२/१, १२२ / ३ / १, गाव बोळिंज, तालुका वसई, जिल्हा पालघर.
३. सर्वे क्र. ३१० (२) आता गावाचा एस. क्र. ४०५ आणि ३११ (१) म्हणून दर्शविले जाते आणि तालुका पनवेल, जिल्हा रायगड.
४. बी - ९०१ तिरुपती अपार्टमेंट्स, भुलाभाई देसाई रोड, मुंबई ४०००२६.
५. युनिट क्र. ४०९, क्रिएटिव्ह इंडस्ट्रियल इस्टेट, एनएम जोशी मार्ग, लोअर परळ (पूर्व), मुंबई - ४०००११.
६. नायक व्हिला - जुना खंडाळा रोड, ४१०४०१.
७. मस्कत हाऊस बंगला- जुना खंडाळा रोड, ४१०४०१.
८. कॅफे भारत रेस्टॉरंट - आयएमसी मार्ग, चर्चगेट रेल्वे स्टेशन समोर, मुंबई ४०००२०.
९. मे. गंगाधर नायक अँड कंपनी - लोअर परळ (पूर्व), मुंबई ४०००११.
१०. मे. नॅक्सपोर्ट ट्रेडिंग कंपनी - लोअर परळ (पूर्व), मुंबई ४०००११.
११. मे. समर्थ कन्स्ट्रक्शन्स - विरार पश्चिम.
१२. मे. चैतन्य कन्स्ट्रक्शन्स - विरार पश्चिम.

श्रीमती उषा यू. नायक यांनी राजीव आणि श्री. प्रकाश गंगाधर नायक यांच्याविरुद्ध पॉवर ऑफ अॅटर्नीचा गैरवापर केल्याबद्दल तक्रार दाखल केली आहे, ज्याच्या आधारे गांवदेवी पोलिस स्टेशन, मुंबईने आयपीसी कलम ४२०, ४०६, ३४ अंतर्गत शून्य एफआयआर क्र. ३ / २०२५ नोंदवला आहे. सध्या वसई-विरार पोलिस स्टेशनकडून या प्रकरणाचा तपास सुरु आहे.

जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, २० ऑक्टोबर १९८९ रोजी रद्द केलेल्या पॉवर ऑफ अॅटर्नी किंवा त्यानंतरच्या कोणत्याही इन्स्ट्रुमेंटवर अवलंबून असलेल्या वरील मालमत्तांबद्दल किंवा कार्यकारी अधिकाऱ्यांच्या इतर कोणत्याही मालमत्तेबद्दल **राजीव, प्रकाश जी. नायक, अरविंद नायक** आणि / किंवा **नागराज शानभाग** (किंवा **राजीव** यांच्यामार्फत किंवा त्यांच्या अंतर्गत दावा करणारी कोणतीही व्यक्ती) कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेने केलेले कोणतेही व्यवहार, घेणे-देणे, करार किंवा व्यवस्था अनधिकृत आहेत आणि ती पूर्णपणे त्यांच्या स्वतःच्या जोखमीवर आणि धोक्यात असतील.

निष्पादक आणि त्यांच्या वारसांना सध्या राजीवसह कोणत्याही व्यक्तीला कोणतेही पॉवर ऑफ अॅटर्नी दिलेले नाहीत. रद्द केलेल्या पॉवर ऑफ अॅटर्नीवर किंवा त्यानंतरच्या कोणत्याही इन्स्ट्रुमेंटवर अवलंबून राहून वर नमूद केलेल्या पक्षांनी केलेले कोणतेही व्यवहार आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत आणि अशा कोणत्याही अनधिकृत कृती, करार किंवा बाबींसाठी ते जबाबदार किंवा उत्तरदायी राहणार नाहीत. शिवाय, अशा कोणत्याही कृतीमुळे त्यांचे हक्क किंवा हितसंबंध धोक्यात आले किंवा त्यांच्यावर प्रतिकूल परिणाम झाला तर योग्य कायदेशीर कार्यवाही किंवा इतर उपचारात्मक कारवाई सुरु करण्याचा अधिकार आमच्या अशिलांकडे राखून आहे.

**मे. ए. व्ही. जैन असोसिएट्स**
श्रीमती उषा उदय नायक, श्रीमती अजिता उदय नायक व श्रीमती स्मिता सदाशिव राव यांच्या वकिलांनी
२६, दाराशॉ इमारत, २४ जांभूळवाडी, धोबी तलाव, मरीन लाईन्स, मुंबई - ४००००२.
dipesh@avjainassociates.com

# मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरण दाद मागण्याचा निर्णय नाही

पान १ वरून

नसतो असे म्हणत निकालाबाबत समाधान व्यक्त केले होते.

त्यामुळे शासन खरोखरच या निकालाविरोधात उच्च न्यायालयात दाद मागणार की नाही? अशीच शंका उपस्थित होत आहे. मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणात उच्च न्यायालयाने आरोपींना निर्दोष सोडल्यानंतर तातडीने सर्वोच्च न्यायालयात जाणारे राज्य सरकार याप्रकरणी का दाद मागत नाही? असा प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान या स्फोटातील मृतांच्या कुटुंबियांनी उच्च न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय घेतला आहे.

# स्वयंपाकाच्या गॅस अनुदानापोटी तेल कंपन्यांना ३० हजार कोटींची सवलत

पान १ वरून- होईल. हा ग्राहकांचे संरक्षण आणि तेल कंपन्यांचे आर्थिक आरोग्य टिकवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. मंत्रिमंडळाने २०२५ -२६ या वर्षासाठी प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना प्रति १४.२ किलो सिलेंडर ३०० रुपयांची सवलत १२ हजार कोटींच्या बजेटसह मंजूर केली आहे. ही सवलत एका वर्षात जास्तीत जास्त ९ रिफिलपर्यंत दिली जाईल. योजनेअंतर्गत गरिबीतील महिलांना अनामत रकमेशिवाय मोफत स्वयंपाकाचा गॅस कनेक्शन, पहिला रिफिल व स्टोव्ह दिला जातो. या निर्णयाचा फायदा १०.३३ कोटी कुटुंबांना होईल.

याशिवाय केंद्र सरकारने आसाम व त्रिपुरासाठी चालू असलेल्या विशेष विकास निधी अंतर्गत चार नवीन बाबी मंजूर केल्या आहेत. ज्यासाठी एकूण ४,२५० कोटी रुपये खर्च होणार आहेत. यामध्ये आदिवासी वस्तींचा विकास, डिमासा आणि युएलएफए गटांसाठी प्रकल्प व त्रिपुरातील आदिवासींसाठी निधी समाविष्ट आहे. मंत्रिमंडळाने बहुविविध शैक्षणिक व संशोधन सुधारणा योजना (मेरीट) मंजूर केली आहे. ज्यासाठी २७५ तांत्रिक संस्थांसाठी (१७५ अभियांत्रिकी संस्था व १०० पॉलिटेक्निक) ४,२०० कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवला आहे. ही योजना २०२५-२६ ते २०२९-३० या कालावधीसाठी आहे. यापैकी २,१०० कोटी रुपये वर्ल्ड बँकेकडून कर्ज स्वरूपात मिळणार आहेत. या योजनेचा उद्देश तांत्रिक शिक्षणाचा दर्जा, समता आणि शासकीय व्यवस्थापन सुधारणे आहे. यामुळे सुमारे ७.५ लाख विद्यार्थ्यांना फायदा होईल. योजनेत डिजिटलायझेशन, बहुविषयक अभ्यासक्रम, कौशल्य विकास, संशोधन वृद्धी, महिला प्राध्यापकांचा विकास आणि रोजगार वाढविण्यावर भर दिला आहे. यामुळे रोजगाराच्या संधी वाढतील व तांत्रिक शिक्षणाचा दर्जा सुधारेल.

# शरीरसंबंधांचे वय अठराच असावे सरकारची सुप्रीम कोर्टात भूमिका

पान १ वरून

नाही. कायद्यांमध्ये विशिष्ट अपवाद तयार केल्यास, अल्पवयीन मुला - मुलींचे संरक्षण करणारे आताचे कायदे कमकुवत होतील. यामुळे बाल लैंगिक शोषणविरोधी कायद्यांचे उद्दिष्ट धोक्यात येईल. कायद्यात बदल करताना त्याचे दूरगामी परिणाम लक्षात घेणे आवश्यक आहे. महिला आणि बालविकास मंत्रालयाच्या जुन्या अभ्यासानुसार ५३.२ टक्के मुलांनी बालपणी एक किंवा अधिक प्रकारच्या लैंगिक शोषणाचा अनुभव आला आहे. यातील तब्बल ५० टक्के शोषणकर्ते हे स्वतःच्या विश्वासातील व्यक्ती पालक, नातेवाईक, शेजारी किंवा शिक्षक होते, असे अहवालात म्हटले आहे.

# एकनाथ शिंदे-आदित्य ठाकरे वरळी कोळीवाड्यात आमनेसामने

पान १ वरून- उबाठाच्या शाखेत कार्यकर्त्यांच्या भेटीसाठी गेले. आदित्य ठाकरे यांनी नारळीच्या बत्तेरी जेट्टी येथे समुद्रकिनाऱ्यावर विधिवत पूजा करून समुद्रात नारळ अर्पण केला. त्यानंतर आदित्य ठाकरे पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, कोळी बांधवांच्या जल्लोशात सहभागी होण्यासाठी इथे आलो आहे. मिंधे गटाचे लोक चोर आहेत. त्यांना आमचा पक्ष चोराला चिन्ह चोरले आहे. उद्या ते आमचा मुखवटा लावूनदेखील फिरतील. असे खूप लोक आजूबाजूने येत-जात असतात यांच्याकडे लक्ष देऊ नका.

# राहुल गांधींच्या बैठकीत उद्धव ठाकरे शेवटच्या रांगेत! सत्ताधाऱ्यांचे टीकास्त्र

पान १ वरून

महाराष्ट्रातील मराठी माणसाचा केलेला अपमान आहे. या टीकेनंतर उबाठा खासदार संजय राऊत यांनी असा खुलासा केला की, उद्धव ठाकरे मागे बसल्याची टीका करणारे लोक फालतू आहेत.

या बैठकीत स्क्रीनवर काही प्रेझेंटेशन होत होते. उद्धवजींना पुढे बसवले होते. पण, त्यांचे म्हणणे पडले की स्क्रीनच्या समोर बसून पाहताना त्रास होतो. नीट दिसत नाही. त्यामुळे आम्ही सर्वच पाठीमागे गेलो. हे भाजपाचे आयटी सेलवाले फालतू लोक आहेत. त्यांना समजायला हवे. उद्धव ठाकरेंचे आणखीही फोटो आहेत, ते तुम्ही पाहिले नाहीत का? त्या ठिकाणी प्रेझेंटेशन सुरू होते. मी स्वतः तिथे होतो. कमल हसन होते. शरद पवारदेखील आमच्या सोबत बसले होते.

**सार्वजनिक जाहीर नोटीस**

हे सर्वसामान्य जनतेच्या निदर्शनास आणून दिले जाते की, श्रीमती सुनंदा कृष्णाजी भोसले, यांचा पत्ता: राजनिगंधा कॉटेज सहकारी गृहनिर्माण संस्था, भाटवाडी मार्केट, घाटकोपर (प.), मुंबई ४०००८४ यांच्याकडे असलेले शेअर प्रमाणपत्र, क्रमांक ३३ ज्यामध्ये भिन्न क्रमांक ३६ ते ४० पर्यंतचे शेअर्स आहेत, ते हरवले/गहाळ झाले आहेत. याबाबत संस्थेकडे डुप्लिकेट शेअर प्रमाणपत्र मिळविण्याबाबत अर्ज प्राप्त झाला आहे.

त्याअनुषंगाने ही नोटीस देण्यात येत आहे की, जर कोणतेही दावे अथवा आक्षेप असतील, तर त्यांनी योग्य त्या पुराव्यांसह ही नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत राजनिगंधा कॉटेज सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कार्यालयात लेखी स्वरूपात सादर करावेत.

वरील मुदतीत कोणताही दावा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास, संस्थेला त्यानुसार संस्थेच्या नियम व उपनियमांनुसार डुप्लिकेट शेअर प्रमाणपत्र देण्याचा अधिकार राहील.

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०९/०८/२०२५

सही/-
राजनिगंधा कॉटेज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित
सदस्यत्वाने,
सचिव

**जाहीर सूचना**

याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की, मी खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत जागेसंदर्भात (**सदर जागा**) **श्री. एम. के. हरिकृष्णन नंबीयार** व **श्रीमती मिनी हरिकृष्णन नंबीयार (मालक)** यांच्या हक्कांची चौकशी करीत आहे.

कोणाही व्यक्तीचा सदर जागेसंदर्भात विक्री, विनिमय, गहाण, प्रभार, भेट, न्यास, देखभाल, उत्तराधिकार, ताबा, भाडेकरार, वहिवाट, धारणाधिकार, अनुज्ञप्ती वा कोणत्याही न्यासाअंतर्गत लाभ हक्क/हितसंबंध, पूर्व क्रय अधिकार वा जुना वहिवाट हक्क वा कोणत्याही करारांतर्गत वा अन्य वासलात वा कोणत्याही विधि न्यायालयाद्वारे वा वैधानिक प्राधिकाऱ्यांद्वारे मंजूर कोणताही निवाडा, आदेश वा हुकूमाअंतर्गत वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा असल्यास त्यांनी त्यासंदर्भात सर्व सहाय्यक दस्तावेजांच्या नोटरीकृत प्रतींसमवेत सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत लिखित स्वरूपात सूचित करावे अन्यथा असे कोणतेही दावे अस्तित्वात नाहीत असे समजण्यात येईल व अगदी असे दावे कायद्यांतर्गत अस्तित्वात असले तरी दावेदारांनी असे दावे अधित्यागित केले आहेत व /वा अटीविरहित व बदलता न येण्याजोग्या स्वरूपात अशा दाव्यांचा वापर करण्याचा हक्क सोडून दिला आहे असे समजण्यात येईल.

**अनुसूची (सदर जागेचे विवरण)**

निवासी फ्लॅट क्र. ५०२, मोजमापित अंदाजे १०२ चौरस मीटर बिल्ट अप क्षेत्र (यामध्ये बाल्कनींचे बंद क्षेत्र समाविष्ट) (सदर फ्लॅट), ५ वा मजला, इमारतीचे नाव प्राइम अॅव्हेन्यू - बी (**सदर इमारत**), सीटीएस क्र. १५१९, १५१९/१, १५१९/२, १५१९/३ व १५१९/४ धारक जमिनीच्या सर्व त्या भाग व भूखंडावरील, स्वामी विवेकानंद मार्ग, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई-४०० ०५६ येथील, सदर इमारतीतील एक कार पार्किंग जागा क्र. १७ (**सदर कार पार्किंग जागा**) समवेत, या मालमत्तेसंदर्भात प्राइम अॅव्हेन्यू बी को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि. नोंदणीकरण क्र. BOM W-KW HSG. (T.C.) १२४७३ चे २००४-०५ दि. १०.०६.२००४ यांच्याद्वारे वितरीत विभिन्न क्र. ८६ ते ९० (दोन्ही समाविष्ट) धारक ५ (पाच) पूर्णतः प्रदानित शेअर्ससंदर्भातील शेअर प्रमाणपत्र क्र. १८. सदर शेअर्स, सदर फ्लॅट व सदर कार पार्किंग जागा एकत्रितरीत्या **सदर जागा** म्हणून उल्लेखित.

**मुंबई, दि. ०९.०८.२०२५**

सही/-
**अॅडव्होकेट महेश लाड**
**द्वारा वाय. के. भगवागर अॅन्ड कं.**
डी ब्लॉक, ४ था मजला, शिवसागर इस्टेट,
डॉ. अॅनी बेझंट रोड, वरळी, मुंबई -४०० ०१८.
mahesh@ykbco.in

AMC Repo
Safe, Secure & Stable

**AMC REPO CLEARING LIMITED**

**CIN : U65929MH2021PLC359108**
**Registered Office :** Unit No. 503, Windsor, Off CST Road, Kalina, Santacruz East, Mumbai 400098
**Website :** www.arclindia.com

**UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED JUNE 30, 2025**

The Unaudited Financial Results of AMC Repo Clearing Limited "The Company" along with the Auditor's Report for the Quarter Ended June 30, 2025 have been reviewed by the Audit Committee and approved by the Governing Board of Directors of the Company on 08th August, 2025, in Pursuant to the Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015.

The aforementioned financials result for the Quarter Ended June 30, 2025 along with the Auditor's Report thereon is available on the website at arclindia.com/financials. The same can also be accessed by scanning the QR Code provided below :

**SCAN THE QR CODE TO VIEW THE RESULTS ON THE WEBSITE OF THE COMPANY**

**For and on behalf of Board of Directors**
**AMC Repo Clearing Limited**

**Kashinath Katakdhond**
**Managing Director**
**DIN : 07716501**
**Date : 08th August, 2025**
**Place : Mumbai**

## ११ ऑगस्टला उबाठाचे राज्यभरात आंदोलन

**मुंबई-** महायुती सरकारच्या विरोधात ठाकरेंच्या शिवसेनेकडून ११ ऑगस्टला राज्यात आंदोलन केले जाणार आहे. महायुतीतील अनेक मंत्र्यांवर आरोप आहेत. या मंत्र्यांचे राजीनामे घ्यावेत, या मागणीसाठी ठाकरेंच्या शिवसेनेकडून महाराष्ट्रात सर्व जिल्ह्यांत जनआक्रोश आंदोलन करणार आहेत. मुंबईतील आंदोलन शिवाजी पार्कमध्ये होणार आहे.




## शरद पवारांच्या नेतृत्वात आज ओबीसी जनजागृती मंडल यात्रा

■ मुंबई

**आगामी** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसी मतदार आकर्षित करण्यासाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाने नवी रणनीती आखली आहे. उद्या शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली ओबीसी जनजागृती मंडल यात्रा काढण्यात येणार आहे. शरद पवार ओबीसी सेलच्या या यात्रेला नागपूर येथून हिरवा कंदील दाखवणार आहेत.

भाजपाचे ओबीसी विरोधी धोरण आणि ओबीसी आरक्षणाचे महत्त्व, शरद पवार यांचे यामधील मोलाचे योगदान जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या टप्पात विदर्भातील ११ जिल्ह्यांत ही यात्रा जाणार असून, तालुक्याच्या ठिकाणी सभादेखील होणार आहे. माजी गृहमंत्री अनिल देशमुख म्हणाले की, भाजपाच्या तथाकथित हिंदुत्ववादी अजेंड्यामुळे ओबीसी आरक्षण आणि सामाजिक न्यायाच्या मुद्यांना बाधा येत आहे. या यात्रेतून शरद पवार यांचे ओबीसी समाजासाठी केलेले कार्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासोबतच ठोस पुराव्यासह भाजपाचा खरा चेहरा उघड केला जाईल.

## पुणे शहर विस्ताराला चालना देणार तीन नवीन पालिकांची स्थापना

**अजित पवारांची घोषणा**

■ पुणे



**राज्याचे** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पहाटे पुण्यातील औद्योगिक भागाचा दौरा केला. यावेळी त्यांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागले. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री पवार यांनी जिल्ह्यात चाकण, हिंजवडी आणि उरळी देवाची-फुरसुंगी-मांजरी अशा तीन स्वतंत्र महापालिका केल्या जाणार असल्याची मोठी घोषणा केली.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, चाकणची वाहतूक कोंडी फोडण्याच्या दृष्टीने सकाळी सहा वाजताच्या सुमारास दौरा केला. एक गाडी थांबली की, त्यामागे गाड्यांच्या रांगा लागतात. पहाटे ही स्थिती तर कामाच्या वेळेत काय अवस्था होत असेल? नॅशनल हायवे, पीएमआरडीए, जिल्हाधिकारी, पालिका आयुक्त या सर्वांना योग्य त्या सूचना दिल्या आहेत. तळेगाव ते शिक्रापूर हा मार्ग सहा पदरी होणार आहे, त्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल. त्यानंतर पुणे-नाशिक हा एलिवेटेड मार्ग होईल. ते केल्याशिवाय गत्यंतर नाही. तुम्ही सहनशीलता दाखवून खूप त्रास सहन केला, पण आता यातून सुटका करू. चाकणमध्ये नगरपरिषद आहे. या ठिकाणी विकासावर मर्यादा येत आहेत. हिंजवडीतही औद्योगिक क्षेत्राच्या विकासाला बंधने येत आहेत. यामुळे चाकण, हिंजवडीला नवीन महापालिका केल्या जाणार आहेत. याचबरोबर उरळी देवाची-मांजरी-फुरसुंगीसाठी नवीन महापालिका केली जाईल. कोणाला आवडो न आवडो या महापालिका होणारच आहेत.

## महादेवी हत्तीणी प्रकरणात तोडगा राजू शेट्टीकडून अंबानींचे आभार

■ कोल्हापूर

**कोल्हापूर** जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील नांदणी येथील जैन मठातील महादेवी हत्तीणीला सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर वनतारामध्ये हलविण्यात आले. आता वनतारा प्रशासनाने नांदणी मठाजवळच उपचार केंद्र उभारून महादेवीवर आवश्यक उपचार करण्याचे सहकार्य केले आहे. त्यामुळे हा वाद संपल्याची घोषणा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी आज केली. याबाबत त्यांनी अंबानी कुटुंबियांचे विशेष आभार मानले.

राजू शेट्टी म्हणाले की, महादेवी हत्तीणी संदर्भातील वाद संपुष्टात आला आहे. वनतारा प्रशासनाने नांदणी जैन मठाला वचन दिले आहे की, आम्ही वनतारामध्ये जे उपचार करणार होतो तेच नांदणी मठाच्या परिसरात उभारण्यात येणाऱ्या केंद्रात केले जातील. महाराष्ट्र सरकार, वनतारा प्रशासन व नांदणी मठ हे मिळून या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात संयुक्त अर्ज दाखल करतील. महादेवीवर नांदणीतच चांगले वैद्यकीय उपचार मिळण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली जाईल. अनंत अंबानी यांनी स्वतः मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. आम्हाला वाद नको आहे.

## हनी ट्रॅप प्रकरणातील आरोपी प्रफुल्ल लोढाला मारले जाईल

**एकनाथ खडसेंचा आरोप**

■ जळगाव

**राज्यात** चर्चेत असलेल्या हनी ट्रॅप प्रकरणातील अटकेत असलेला आरोपी प्रफुल्ल लोढा याला जेलमध्येच संपवण्याचे षड्यंत्र रचले जात असल्याचा गंभीर आरोप शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी केला आहे.

काही दिवसांपूर्वी प्रफुल्ल लोढाशी संबंध जोडणारे जुने व्हिडिओ आणि छायाचित्रे सार्वजनिक करून खडसे यांनी मंत्री गिरीश महाजन यांच्यावर अनेक आरोप केले होते. आता त्यांच्या या दाव्यामुळे पुन्हा खळबळ उडाली आहे.



एकनाथ खडसे म्हणाले की, हनी ट्रॅप प्रकरणातील आरोपी प्रफुल्ल लोढाला जेलमध्येच संपवण्याचे काम केले जाऊ शकते. या प्रकरणात यांचा एक मंत्री अडकला आहे. लोढाला महिनाभर जेलमध्ये ठेवले आहे.

कदाचित त्याला जेलमध्येच मारून टाकतील. यासाठी मोठे षड्यंत्र रचले जात आहे. प्रांजल खेवलकर प्रकरणाचा तपास करणाऱ्या संस्था या रूपाली चाकणकर यांच्याच आहेत. माझे म्हणणे असे की, तपास कोणाचाही असो, पण सत्य पुढे आले पाहिजे. याबाबत पोलिसांनी स्पष्ट भूमिका मांडावी.



आज नारळीपौर्णिमा उत्सवानिमित्त कोळी बांधवांनी आपल्या बोटीची पूजा केली
(छायाः दीपक साळवी )

## 'खालिद का शिवाजी' चित्रपट कान महोत्सव यादीतून हटवला

■ मुंबई

**'खालिद** का शिवाजी' या चित्रपटातून छत्रपती शिवाजी महाराज यांचा खोटा इतिहास सांगितल्याचा आरोप हिंदुत्ववादी संघटनांनी केला होता. राज्याचे सांस्कृतिक मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी हा चित्रपट कान महोत्सव यादीतून हटवल्याची माहिती आज दिली. तसेच सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशनने (सीबीएफसी) दिलेल्या प्रमाणपत्राचा फेरविचार करण्याची सूचना सांस्कृतिक मंत्रालयाच्या प्रधान सचिवांना केल्याचेही त्यांनी सांगितले.

आज ॲड. आशिष शेलार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. 'खालिद का शिवाजी' चित्रपटामुळे भावना दुखावल्या तर हा चित्रपट कान महोत्सवाला का पाठवला, याचे स्पष्टीकरण देताना ते म्हणाले की, हा चित्रपट आपण कान महोत्सवाला पाठवला हे खरे आहे. त्यासाठीच्या विशेष समितीने त्याचे नाव सुचवले होते. मी केवळ त्याची घोषणा केली होती. आता या चित्रपटासंदर्भात चौकशी सुरू केली आहे. कान महोत्सव यादीतून सरकारने हा चित्रपट काढला आहे. यासंदर्भात सरकारने कान महोत्सव आयोजकांना ई-मेल पाठवला आहे. त्याचबरोबर सीबीएफसीने या चित्रपटाचे पुनरावलोकन करायचा निर्णय घेतला आहे. कारण हा विषय त्यांच्या अखत्यारित येतो. सीबीएफसीने चित्रपटाशी संबंधित लोकांना नोटीस बजावली आहे.

## बोगस शिक्षक भरती प्रकरणात एसआयटी पथकाची स्थापना

■ मुंबई

**बनावट** शालार्थ आयडी तयार करून बोगस शिक्षक भरती प्रकरणात चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केले आहे. हे पथक नागपूरसोबतच नाशिक, जळगाव, मुंबई, बीड आणि लातूर येथील शिक्षक भरती प्रकरणांची चौकशी करणार आहे.

नागपूर विभागात काही दिवसांपूर्वी बोगस शिक्षक भरतीचा मोठा घोटाळा उघडकीस आला होता. अपात्र शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नावे शालार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट करून त्यांना वेतन अदा करण्यात आले. या प्रकरणी बनावट शालार्थ आयडी तयार करून भरती केल्याच्या आरोपावरून शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांना अटकही करण्यात आली होती. पुणे येथील विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या नेतृत्वाखाली ही समिती नियुक्त करण्यात आली आहे. या पथकात पोलीस महानिरीक्षक मनोज शर्मा आणि शिक्षण आयुक्तालयातील सहसंचालक हरुन आतार यांचा समावेश आहे.

## चिंचपोकळीचा चिंतामणीचे १७ ऑगस्टला आगमन

■ मुंबई

**मुंबईतील** प्रतिष्ठेच्या सार्वजनिक गणपतींपैकी एक असलेल्या चिंचपोकळीचा चिंतामणीचे १७ ऑगस्ट रोजी नेहमीच्या उत्साहात, वाजत-गाजत दिमाखात आगमन होणार आहे. दरवर्षी लाखो गणेशभक्त चिंचपोकळीच्या चिंतामणीचा आगमन सोहळा पाहण्यासाठी गर्दी करतात. आपल्या लाडक्या चिंतामणीचे पहिले दर्शन घेण्यासाठी भाविक कमालीचे उत्सुक असतात. छत्रपती संभाजी महाराज यंदाच्या चिंतामणीची संकल्पना आहे.

## ड्रग प्रकरणातील आरोपीकडून मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंचा सत्कार



■ धाराशिव

**महसूल** मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा ड्रग प्रकरणातील कथित मास्टरमाईंड विनोद पिंटू गंगणे याच्या हस्ते सार्वजनिकरित्या सत्कार करण्यात आला. तुळजाभवानी मंदिर विकास आराखड्यासाठी ८५० कोटी रुपये मंजूर केल्याबद्दल चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपा आमदार राणा पाटील यांच्या जाहीर सत्काराचा कार्यक्रम तुळजापूर येथे आयोजित करण्यात आला.

यावेळी विनोद गंगणेला शाल-श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. इतकेच नव्हे तर मंत्री बावनकुळे यांनी गंगणेला जवळ बोलावून पाठ थोपटली आणि त्याच्या कार्याचे कौतुक केले. या घटनेचे अनेक फोटो व व्हिडिओ व्हायरल झाले असून, नागरिकांकडून संतप्त प्रतिक्रिया उमटल्या आहेत. उबाठा आमदार अंबादास दानवे म्हणाले की, तुळजापूर ड्रग प्रकरणातील आरोपीला महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीच संरक्षण दिले.

**फेस्टिवल सेल**
8200 गृह उपयोगी व्हेरायटीझ वर 50% पर्यंत डिस्काउंट
सर्व आयटम वर, वेलस्पन ,ट्रायडंट ,बॉम्बेडाईग ,ग्रीनरोल,
DRYING स्टँड्स , छत्री (50% पर्यंत डिस्काउंट
पिलो आणि CURTAIN वर ) क्रोकरी, डोरमेट ,
टेबलमेट, कारपेट ,ऐप्लायन्सस ,स्टीलची भांडी,
सेलो आणि प्लास्टिक आईटम योग्य दरात उपलब्ध
**शणगार**
Opp.Joualukkas, Chandavarkar road, Borivali(west)
9920155012/9892042981/8454916561
(All days open)




## सलमान खानला शोमध्ये आमंत्रण कपिल शर्माच्या कॅफेवर पुन्हा हल्ला

■ ओटावा

**कॉमेडियन** कपिल शर्माच्या कॅनडातील कॅप्स कॅफेवर काल पुन्हा गोळीबार करण्यात आला. या कॅफेवर हल्लेखोरांनी २५ गोळ्या झाडल्या. त्यामुळे कॅफेच्या खिडक्या फुटल्या. सुदैवाने कोणीही जखमी झाले नाही. लॉरेन्स बिश्नोई टोळीच्या गोल्डी ढिल्लो याने या हल्ल्याची जबाबदारी समाजमाध्यमावरून स्वीकारली आहे. या टोळीतील हॅरी बॉक्सर याचा ऑडिओ धमकीचा संदेशही व्हायरल झाला आहे.

हॅरी बॉक्सरने संदेशात म्हटले की, कपिल शर्माच्या रेस्टॉरंटमध्ये आधी आणि आता गोळीबार झाला. कारण त्याने सलमान खानला त्याच्या शोच्या उद्घाटनासाठी आमंत्रित केले होते. पुढच्या वेळी दिग्दर्शक, निर्माता, कलाकार यांना आम्ही इशारा देणार नाही. थेट छातीवर गोळी झाडली जाईल. मुंबईतील सर्व कलाकार आणि निर्मात्यांना इशारा आहे. आम्ही मुंबईचे वातावरण इतके बिघडवू की तुम्ही कल्पनाही केली नसेल. जर कोणी सलमानसोबत काम केले, तर तो छोटा कलाकार असो किंवा छोटा दिग्दर्शक असो. आम्ही कोणालाही सोडणार नाही.आम्ही त्याला मारू. त्याला मारण्यासाठी आम्हाला कोणत्याही थराला जावे लागले तरी चालेल.

## नाशिकमध्ये उबाठा-मनसे बैठकीत नेत्यांमध्ये वाद

**नाशिक-** मनसे आणि उबाठा यांच्या युतीच्या चर्चा राज्यभरात सुरू आहेत. आज नाशिकमध्ये मनसे आणि उबाठा पदाधिकाऱ्यांची उबाठा कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत विधानसभा निवडणुकीतील प्रचाराच्या मुद्यावरून उबाठा नेते जयंत दिंडे आणि विनायक पांडे यांच्यात वाद झाला. यानंतर विनायक पांडे बैठकीतून निघून गेले. नाशिकातील रस्त्यावरील खड्डे, वाढती गुन्हेगारी, अनियमित पाणीपुरवठा, तसेच शेतकऱ्यांचे प्रश्न यावर या बैठकीत चर्चा करण्यात आली. भाषण करताना जयंत दिंडे यांनी निवडणुकीचा आढावा घेत वसंत गीते यांच्या पराभवाचा उल्लेख केला. त्यांनी एमडी ड्रग्जसह काही मुद्दे नीट हाताळले असते तर विजय मिळाला असता, असे मत व्यक्त केले. यावर प्रतिक्रिया देताना गीते यांचे जवळचे मित्र आणि माजी महापौर पांडे यांनी, ४० वर्षांपासून आम्ही लढा देत आहोत, तर मग आम्ही नेमके केले तरी काय? असा थेट सवाल केला.

## रोहित पवारांच्या कार्यकर्त्याकडून माझ्या कार्यकर्त्याला मारहाण

■ सोलापूर

**भाजपा** आमदार गोपीचंद पडळकर यांच्या सोलापूर येथील शरणू हांडे या कार्यकर्त्याचे अपहरण करून बेदम मारहाण करण्यात आली. पडळकर यांनी आज सकाळी रुग्णालयात भेट देऊन हांडेची विचारपूस केली. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्या कार्यकर्त्यांनी मारहाण केली, असा आरोप पडळकर यांनी केला.

यावर सरकार विरोधात बोलत असल्याने कारवाई आणि माझा आवाज दाबण्याचा प्रयत्न सुरू आहे. मी तरीही शांत बसणार नाही. तुम्ही या प्रकरणाची एसआयटी चौकशी करा, असा पलटवार रोहित पवार यांनी केला.



**आ. पडळकरांचा आरोप**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अमित सुरवसेने २०२१ मध्ये गोपीचंद पडळकर यांच्या गाडीवर दगडफेक केली होती. त्याचा बदला घेण्यासाठी शरणू हांडेने त्याला मारहाण केली होती. याच रागातून सुरवसेने सहकाऱ्यांच्या मदतीने पुण्यातून कार भाड्याने घेऊन सोलापुरात येत, शरणू हांडे याचे शस्त्राच्या धाकावर घराजवळून अपहरण केले. त्यानंतर ते त्याला घेऊन कर्नाटकच्या दिशेने निघाले होते. या अपहरणाची माहिती मिळताच सोलापूर शहर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत चार पथके तयार केली. होर्टी गावाजवळ अमित सुरवसे आणि त्याच्या साथीदारांना ताब्यात घेतले. या चौघांवर अपहरण, हत्येचा प्रयत्न आणि मारहाणीचा गुन्हा दाखल केला. शरणू हांडेने असा आरोप केला की, अमित सुरवसे व त्याच्या सहकाऱ्यांनी मारहाण करत रोहित पवार यांना व्हिडिओ कॉल केला. त्यांनी मला माफी मागण्यास सांगितली. मी नकार दिल्याने त्याला फार मस्ती आहे. तुम्ही पाहून घ्या असे म्हणत त्यांनी फोन कट केला.

गोपीचंद पडळकर म्हणाले की, आरोपी अमित सुरवसे याने यापूर्वी माझ्या गाडीवरही हल्ला केला होता.



**AMALNER :** Vikas lottery & Gen. store : 8999612300 | **AHILYANAGAR :** Lucky lottery - 9423792145, Tulsi Lottery Agency - 9921198992 | **ANDHERI :** Megastar Distributor - 9967250008 **AMARAVATI :** New Hindustan Lottery - 7507867972 | **BORIWALI :** Diamond Corporation - 8657436773 | **BHAYANDER :** Balaji Sankari Agency - 9833213081 | **CHANDRAPUR :** Mahalaxmi Agency - 94221 36124/7558215696 | **DADAR :** Shree Ganesh Enterprises - 9870017798, Shree Siddhi Samarth Agency - 93261 96320, Ambika Lottery - 70457 19586, Shree Enterprise - 8422996345 | **DHULE :** Agarwal Lottery Agency - 9422706933 / 8766776900 | **GOREGAON :** Vishesh Distributers - 7900123332, Lambodar Enterprises - 9819224257, Multistar Distributor - 9930425378 | **GONDIA :** R.K. Lottery Mandi - 9325116868 | **GIRGAON :** Trimurti Lottery Agency - 9773373267, B.V. Kothavale - 9820629401| **ICHALKARANJI :** Maharaja Associates- 9028485789, Maharaja LotteryCentre-9764662643/ 9158729426 | **JALGAON :** Vyas Agency - 9890056854, Baheti Lottery - 9420389239 | **KOLHAPUR :** Mahavir Lottery Agency - 9822248473, 7066275145 | **KALYAN :** Prince Lottery - 9819574813 | **KALBADEVI :** Mewad Agency - 9833253514 | **KHAMGAON :** Matoshree Enterprises - 9922813194 | **MUMBAI :** Prince Agency - 9833748152 | **NERUL :** Shree Ganesh Krupa Agency - 9920116957 | **NAGPUR :** Lottery Bhandar - 9764688000, Balaji Marketing - 9371034883, Siraj Enterprises - 9822472123 | **NANDED :** Jagdamba Lottery Centre - 8956486986 , Prasad Enterprises - 9421908570, Shree Sai Krupa Lottery Agency - 9822767566, | **NASHIK :** Chirag Enterprises - 9168199999 | **SAMBHAJI NAGAR :** Rukmini Enterprises - 9822899520/8007059111, Komal Agency - 9370224810 | **SOLAPUR :** Barad Lottery Agency - 9420545869/9850501313 | **PANVEL :** Phatak Enterprises - 9167552882 | **PUNE :** Shri Gurudev Datta Lot. Agency - 9518591612, Parihar Enterprises - 9422517486, Kamal Agency - 830492061, Amit Lottery Agency - 9422087688 | **SANGLI :** Kishor M Shah - 8055204763 / 552529044 | **SATARA :** Samrat Agency - 8805277966 **YAWATMAL :** New Jai Ambe Lottery Bhandar - 9421844726
अधिक माहितीसाठी कॉल करा (टोल फ्री) - 1800 266 0088
Mumbai - 8754562382 / 7845827316 / 8928588642 7397776862 /9372275063, Solapur - 8805060191, Kolhapur - 9922431881, Nagpur - 9922090691 / 7845827259